१८।३।६७
४० पैसे

# माणूस
साप्ताहिक




**काँग्रेसेतर सरकार (नवा घरमालक)**
"आम्ही कारभार स्वच्छ करू"

ज्वलंत राष्ट्रवादाच्या

भयानक दीप्तीचा

ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या

प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती

राजहंस प्रकाशन,

४१९ नारायण पेठ, पुणे २.





## एक समग्र साप्ताहिक

*वर्ष : सहावे*
*अंक : सदतीसावा*
*किंमत : चाळीस पैसे*
*वार्षिक वर्गणी : वीस रुपये*

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
*अ. मा. साधू*
*दिलीप माजगावकर*
*सौ. निर्मला पुरंदरे*

**व्यवस्था विभाग**
*अ. वा. गंधे*
*अ. वि. गणपत्ये*

*पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.*
*दूरध्वनी – ५७३५९*


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पत्र-मैत्री

**स. न.** **मार्च ६**

आपला दि. ४–३–३७ चा 'माणूस' अंक वाचला. सुपे इथे 'माणूस प्रतिष्ठान'ची जी उल्लेखनीय कामगिरी चालू आहे, त्याबद्दल धन्यवाद. आपल्यासारख्या छोटया 'माणसाने' किती अत्युत्तम कार्यक्रम आखून तो किती लवकर अंमलात आणला हे पाहून आश्चर्य निश्चितच वाटते.

'माणूस प्रतिष्ठान'साठी वैयक्तिक निधी जमवून त्यातून अशा प्रकारची कामे केल्यास ठीक होईल, असे वाटते.

एका भागात जी काही उल्लेखनीय कामगिरी होत आहे ती 'माणूस' जिकडे जाईल तिथे पोचवील व आपली प्रगती करील, हीच अपेक्षा.

**–विलास कुलकर्णी,**
वडवळ, उस्मानाबाद

**स. न.** **मार्च ६**

अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' चे चालक सहमत असतीलच असे नाही. तसेच 'माणूस' चे वाचकही सहमत असतीलच, असे नाही. हल्लीची मुखपृष्ठे विशेष आवडत नाहीत.

'दिल्ली दरबार', 'मुक्ताफळे', 'विचार वारे', 'भिंतीच्या तुकडया' इ. नेहमीची सदरे फार आवडतात. अपवाद 'तुमचे भविष्य आमचा अंदाज'. ॲड. माधव कानिटकर यांची लेखमाला अत्युत्कृष्ट होती. ४ तारखेच्या अंका

तील 'स्पर्शकाळ' ही कथा आवडली.

आपण कै. स. गो. बर्वे, कृष्ण मेनन, एस. एम. जोशी, डॉ. रफिक झकारिया, दयानंद बांदोडकर यांची दुर्मीळ चरित्रे देऊन माझ्या उथळ ज्ञानात खोल भर टाकली आहे. क्रीडा जगताचे एक नवीन सदर आपण लवकरच सुरू करून 'माणूस' ला परिपूर्णता आणाल, अशी मी आशा करू शकतो काय ?

— अनिल अभ्यंकर, पवई.

स. न. मार्च ६

आपल्या दि. ४ मार्च १९६७ च्या प्रसिद्ध झालेल्या 'माणूस' अंकात खास वार्तापत्र "स्वतंत्र गोव्याची कथा-आणि व्यथा" हा विशेष लेख प्रसिद्ध झाला होता. खरोखरच आपण वास्तवता काय आहे, हे निरपेक्षपणे प्रतिपादन केलं यात शंकाच नाही. त्यामुळं सर्व-साधारण लोकांना सत्यस्थितीची जाणीव झाली. त्याबद्दल 'माणूस'ला धन्यवाद. अशाच प्रकारचे लेख प्रसिद्ध होत राहणं हेच 'माणूस'चं खरंखुरं यश आहे.

—रमेश पुराणिक,
औरंगाबाद.

स. न. फेब्रु. २३

आपण प्रसिद्ध केलेले आपले साप्ताहिक 'माणूस' हे वाचून समाधान वाटले. 'माणूस' ह्या साप्ताहिकामध्ये 'स्वतंत्र गोव्याची कथा आणि व्यथा' या लेखातील—

"त्यामुळे पोर्तुगीजांना आणि पोर्तुगीज मिशनऱ्यांना मराठ्यांविषयी आणि महाराष्ट्राविषयी पूर्वीपासूनच अढी आहे. द्वेष आहे." यामध्ये पोर्तुगीजांना मराठ्यांविषयी द्वेष किंवा अढी आहे किंवा नाही, हे मी सांगू शकत नाही; परंतु पोर्तुगीज मिशनऱ्यांमध्ये द्वेष किंवा अढी असणारच नाही. मिशनऱ्यांनी जर अढी किंवा द्वेष बाळगला असता तर त्यांनी महाराष्ट्रीयन मुलांना त्यांनी उघडलेल्या शाळेत, हायस्कूलमध्ये, कॉलेजात, प्रवेश दिला नसता. परंतु असे काहीच दिसून यत नाही. उलट त्या विरुद्ध दिसून येते. पोर्तुगीज मिशनऱ्यांना महाराष्ट्राविषयी प्रेम आहे. तरी हा मुद्दा मनाला खटकतो. तरी आपण अधिक स्पष्ट खुलासा करा.

— अशोक लोखंडे, कासरवाडी.

स. न. फेब्रु. २५

आजच्या तरुण पिढीला 'मार्मिक' व 'माणूस' यांचं फार मोठं ऋण मान्य केलं पाहिजे. (अर्थात मार्गदर्शनाचे किंवा नेतृत्वाचे दोघांचे मार्ग भिन्न आहेत.) शहराचं आकर्षण असणाऱ्या तरुणांना खेड्याची दिशा दाखवण्याचं महत्कार्य आपण करताहात.

तसेच तरुणांचे स्फूर्तिस्थान विवेकानंद व समाजपुरुष श्री. बाबासाहेब आमटे यांचं साहित्य क्रमशः प्रसिद्ध करावं.

निवडणूकविषयक अनेक लेख आपण 'माणूस'मधून प्रसिद्ध केलेत. आता निवडणुका संपल्या. त्यांतील निरनिराळ्या पक्षांच्या किंवा व्यक्तींच्या यशापयशाचे चर्वितचर्वण 'माणूस'मधून होऊ नये असं वाटतं.

— प्रभाकर रा. कालेकर, मुंबई.

# कै. बर्वे

पुणे

मुंबई

दिल्ली

दिल्ली दरबार

श्री. स. गो. बर्वे यांच्या निधनाने एका सुसंस्कृत, सौजन्यशील आणि सहिष्णू जीवनाचा अंत झाला. त्यांचे निधन जितके अकाली होते, तितकेच अनपेक्षितही. मुंबईमधील श्री. कृष्ण मेनन यांच्याबरोबरची अतिशय चुरशीची लढत देऊन श्री. बर्वे दिल्लीला परतून दहा-बारा तास व्हायच्या आतच सर्वसमर्थ काळाचा त्यांच्यावर घाला पडला. दिल्लीस मध्यंतरी बरेच दिवस त्यांचे वास्तव्य नव्हते व त्यामुळे कामे बरीच साचून राहिली होती. मुंबईमध्ये निवडणुकीचा निर्णय जाहीर होताच दिल्लीस परतून साचलेली कामे हातावेगळी करण्याची त्यांची इच्छा होती. परंतु मुंबईतील मतदार त्यांचा सत्कार केल्याशिवाय त्यांना सोडावयास तयार नव्हते. मतदारांच्या प्रेमळ आग्रहामुळे बर्वे यांचा नाइलाज झाला व त्यांना दिल्लीस जाण्याचा बेत पुढे ढकलावा लागला. शेवटी रविवारी शेवटचा सत्कार समारंभ आटपून सोमवारी सकाळी ते विमानाने दिल्लीस आले. योगायोगाची गोष्ट अशी की त्यांचे प्रतिस्पर्धी श्री. कृष्ण मेनन हेही त्याच विमानात होते. विमान-प्रवासात दोघांच्या मनमोकळ्या गप्पा झाल्या. विमानतळावर श्री. बर्वे थेट त्यागराज रोडवरील आपल्या निवासस्थानी आले व टेबलावरचे कागदपत्र चाळण्यास त्यांनी प्रारंभ केला.

त्यांच्या आगमनाची वार्ता कळताच सारखा त्यांचा फोन खणखणू लागला. प्रत्येकजण यशाबद्दल अभिनंदन करीत होता. टेबलावर अभिनंदनाच्या पत्रांचाही ढीग पडला होता. भारताच्या निरनिराळ्या



सभ्यता गेली, सौजन्य गेले.

ठिकाणांहून ही पत्र आली होती. ती पत्रे वाचताना श्री. बर्वे गहिवरले आणि आपल्या मित्रास म्हणाले, "गेले दोन महिने निवडणुकीचे दडपण होते. परंतु त्यापेक्षाही या अभिनंदनाच्या वर्षावाने मी अधिकच दडपून गेलो आहे."

नव्या प्रधानमंत्र्याच्या निवडणुकीसाठी येथे कोणकोणते बेत आखले जात आहेत, याची त्यांनी माहिती विचारली. एवढ्यात इंदिरा गांधी यांच्याकडून 'उद्या भेटावयास या,' असा निरोप आला. नव्या केंद्रीय मंत्रिमंडळात बर्वे यांची नियुक्ती होणार, अशी कुजबुज ते येथे येण्यापूर्वीच ऐकू येत होती. इंदिरा गांधींच्या निरोपामुळे त्या बातमीला दुजोरा मिळाला. रात्री आठ वाजण्याच्या सुमारास भेटीची वेळ विचारण्यासाठी बर्वे यांनी इंदिरा गांधी यांना फोन केला; परंतु त्या बाहेर गेल्या असल्यामुळे त्या वेळी बोलणे काही झाले नाही. नंतर 'पुन्हा फोन करू' असे म्हणत बर्वे आपल्या इतर कामांकडे वळले. परंतु तासाभरातच त्यांच्या छातीत दुखू लागले आणि वीस मिनिटांच्या आतच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

प्रथम या बातमीवर कोणाचाच विश्वास बसेना. परंतु आकाशवाणीवरून ते दु:खद वृत्त कळल्यानंतर परिचित आणि अपरिचित सारेच बर्वे यांच्या निवासस्थानाकडे निघाले. इंदिरा गांधी त्यांच्या अंत्यदर्शनासाठी येऊन गेल्या, तेव्हा झाल्या प्रकाराने त्या इतक्या भांबावल्या होत्या की, त्यांच्या तोंडून शब्दच बाहेर फुटेना. यशवंतराव चव्हाण, मोरारजी देसाई आदी अनेक वरिष्ठ मंडळी येऊन गेली. दिल्लीतील महाराष्ट्रीयांची तर रीघ लागली होती. श्री. बर्वे यांचा पार्थिव देह पलंगावर ठेवण्यात आला होता. त्यांचा चेहरा इतका शांत दिसत होता, की ते मरण पावले आहेत याची कल्पना करून घेणे जड जात होते. निवडणुकीच्या श्रमाने श्रान्त झालेले त्यांचे शरीर विश्रांतीसाठी विसावले आहे, असेच वाटत होते. परंतु बर्वे चिरविश्रांतीच्या मार्गाने कोणालाच न सांगता निघून गेले होते. प्रत्येकाच्या तोंडून हेच शब्द निघत होते—"एका सुसंस्कृत, सौजन्यशील आणि सहिष्णू जीवनाचा येथे अंत झाला आहे."

## लोकहितैषी अधिकारी

कै. बर्वे यांचे वैशिष्ट्य हे होते की, त्यांचे हे सौजन्य राजकीय पुढाऱ्यांप्रमाणे वरकरणी वा दर्शनी नव्हते. १९३५ पासून १९६० पर्यंतची पंचवीस वर्षे त्यांनी सनदी नोकरीत काढली. आपल्या देशातील सनदी नोकर येथील जनतेचा आणि आपला काही संबंध आहे, असे कधीच मानीत नसत. परंतु बर्वे यांचे वर्तन सनदी नोकरांच्या रूढ वर्तनाशी विसंगत होते. लोकांत मिसळल्याने, त्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यात व त्या दूर करण्याचा प्रयत्न करण्यात त्यांना कोण धन्यता वाटे!

पुण्याचे कलेक्टर म्हणून ते काम पाहू लागल्यापासून त्यांच्या कार्याचा विशेष बोलबाला झाला. महात्मा गांधींच्या खुनाचे निमित्त साधून पुणे शहरात जाळपोळीचे

सत्र सुरू होताच त्याला आळा घालण्यासाठी बर्वे यांनी केलेली कामगिरी अद्यापही लोकांच्या स्मरणात आहे. त्यानंतर थोड्याच दिवसांनी पुण्याच्या नगरपालिकेचे महापालिकेत रूपांतर झाले व या महापालिकेचे पहिले कमिशनर म्हणून कै. बर्वे यांचीच नेमणूक झाली. पुणे शहराच्या सर्वांगीण विकासाठी त्यांनी त्या वेळी जी धडाडीने पावले टाकली, तेव्हा बऱ्याच हितसंबंधी लोकांचा त्यांना विरोध झाला. महापालिकेच्या बैठकीत त्या वेळची दादा मंडळी 'इथं तुमचं शहाणपण नको, आम्ही सांगतो तसं वागायला हवं,' अशी दमदाटीची भाषा बोलू लागताच या मंडळींना त्यांना समजणाऱ्या भाषेत सुनवावयास बर्वे यांनी कमी केले नाही.

पुढे ते महाराष्ट्र सरकारचे सचिव म्हणून काम करू लागले. या कामात कोयना धरणाच्या उभारणीसाठी त्यांनी जे प्रयत्न केले व जो पुढाकार घेतला त्याबद्दल महाराष्ट्राने त्यांचे ऋणी राहिले पाहिजे. एक सनदी नोकर म्हणून लोकहिताच्या दृष्टीने आपण एवढे कार्य करीत असतानाही नोकरीमुळे या कार्याचा व्याप आपणांस वाढविता येत नाही यामुळे ते अस्वस्थ होते व म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होताच सनदी नोकरीचा आराम सोडून राजकारणाच्या धकाधकीत उतरण्याचे त्यांनी ठरविले. १९६२ च्या निवडणुकीच्या वेळी ते पुणे शहरातून विधानसभेवर निवडून आले व महाराष्ट्राचे अर्थमंत्रिपद त्यांनी स्वीकारले.

## मंत्रिपदाचा राजीनामा

महाराष्ट्राची कृषि-औद्योगिक अर्थव्यवस्था उभारण्याच्या किती तरी योजना त्यांच्या डोळ्यांसमोर येत होत्या. परंतु बर्वे अर्थमंत्री झाल्यामुळे आपल्या वैयक्तिक स्वार्थाला वाव मिळत नाही, असे दिसून यताच सहकारी मंत्र्यांनी त्यांच्याशी असहकार करावयास प्रारंभ केला. या स्वार्थी सहकाऱ्यांचा विरोध शेवटी इतक्या विकोपास गेला की त्यांच्यासारख्या अर्थशास्त्रज्ञाकडून अर्थखाते काढून घेण्यात येऊन उद्योगखाते सोपविण्यात आले. कै. बर्वे यांनी मंत्रिपद स्वीकारले, तेव्हा त्यांच्यापुढे निःस्पृह आणि लोकाभिमुख प्रशासनाचे स्वप्न तरळत होते; परंतु येथे त्यांना अनुभव आला तो विपरीतच. त्यांच्या नि.स्पृहतेमुळे चिडलेले त्यांचे सहकारी त्यांचा सल्ला विचारीनासे झाले. अशा परिस्थितीत नामधारी मंत्रिपदावर बर्वे यांचे समाधान होणारे नव्हते व म्हणूनच त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा देण्याचे ठरविले. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातून बाहेर पडताना बर्वे यांना हेच शल्य बोचत होते की येथील राजकारणाचे स्वरूप इतके स्वार्थी आणि संकुचित झाले आहे की कोणत्याही स्वाभिमानी व्यक्तीला आपल्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार काम करणे अशक्य व्हावे.

कै. बर्वे यांनी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याचे ठरविल्याचे कै. लालबहादूर शास्त्री यांना कळताच त्यांनी बर्वे यांना दिल्लीस बोलावून घेतले व चौथ्या योजनेचा आराखडा तयार करण्यासाठी नियोजन मंडळात येण्याचा आग्रह केला. कै. शास्त्री यांनी सोपविलेली जबाबदारी पार पाडताच त्यांनी नियोजन मंड-

ळाचा राजीनामा देऊन मुंबईतून लोकसभेची निवडणूक लढविली. क. बर्वे यांनी मुंबईतून उभे राहण्याचे ठरविताच महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या सूत्रधारांनी त्यांच्यावर भलभलते आरोप करण्यास प्रारंभ केला; परंतु महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील कटू अनुभवांमुळेच बर्वे यांनी तसा निर्णय केला हे ज्यांना माहीत होते त्यांना हे आरोप किती पोकळ आहेत हे कळत होते.

मुंबईत श्री. कृष्ण मेनन यांच्यासारख्या मातब्बर व्यक्तीशी सामना द्यावयाचा होता. परंतु तरीही बर्वे यांनी वैयक्तिक टीकेचा आधार न घेता केवळ वैचारिक भूमिकेवरून ही निवडणूक लढविली व आपल्या निःस्पृह चारित्र्याच्या आणि जन-हितैषी विद्वत्तेच्या बळावर ती जिंकलीही; परंतु या दोन महिन्यांच्या प्रचार-मोहिमेत त्यांना इतके श्रम झाले, की त्याच श्रमांनी त्यांचा बळी घेतला.

## मंत्रिपदांचे वाटप

कै. बर्वे यांच्या कर्तबगारीला आता कोठे बहर येण्यास प्रारंभ झाला होता. आणखी किमान दहा वर्षे तरी दिल्लीत राहून आपल्या शक्तीनुसार लोकसेवेचे कार्य करण्याचा त्यांचा विचार होता. केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांना स्थान मिळणार, ही गोष्ट जवळ जवळ निश्चित झाल्यासारखी होती. परंतु या मंत्रिपदाचाही त्यांना लोभ होता असे नव्हे. कारण मंत्रिपदाची वाटणी करताना केवळ पात्रतेचाच विचार होतो अशी आपल्याकडे परिस्थिती नाही, हे त्यांना माहीत होते.

याच विषयावर त्यांच्याशी एकदा मनमोकळेपणाने बोलण्याची संधी मला लाभली होती. त्यागराज रोडवरच्या त्यांच्या निवासस्थानाच्या हिरवळीवर रात्रीच्या वेळी आम्ही दोघे नानाविध विषयांवर बोलत होतो. मंत्रिपदाचा विषय ओघानेच आला. ते म्हणाले, " हे बघा तुमच्यासारख्यांच्या सदिच्छा मी जाणू शकतो. परंतु मंत्रि-मंडळाची सूत्रे ज्यांच्याकडे येतील, त्यांना माझा अंतर्भाव करणे सोयीचे वाटले तर मला मंत्रिपद मिळेल; मी गैरसोयीचा वाटलो तर मला वगळण्यात येईल. सत्ता-स्पर्धेच्या राजकारणाच्या प्रवाहात पोहताना माझा आधार उपयोगी ठरला तर माझा हात धरण्यात येईल. परंतु माझा अडथळा होतो आहे असे दिसल्यावर इतर कोण-ताही विचार न करता मला बुडविण्याचा प्रयत्न करण्यासही मागेपुढे पाहिले जाणार नाही, हे मला पक्के मला माहीत आहे. आणि म्हणूनच कोणती ी आशा मनात न बाळगता केवळ लोकसभेत जाता यावे, एवढीच ही निवडणूक लढविण्यामागची माझी भूमिका आहे."

दुर्दैवाची गोष्ट ही की, या नव्या लोकसभेचे दरवाजे उघडण्यापूर्वीच कै. बर्वे यांनी आम्हा सर्वांचा निरोप घेतला—अगदी अनपेक्षित आणि कायमचा. ●

—सदाशिव पेठकर

# धावबाद

बर्वे अकस्मात गेले. त्यांच्या जाण्याने राजकारणातली निःस्पृहता गेली !

क्रिकेटचे मैदान तुडुंब भरलेले असावे. आपल्या संघाची घसरगुंडी सुरू असावी. एकच चिकटून असलेला खेळाडू अचानक बाद व्हावा म्हणजे जी सर्वत्र अवकळा पसरते, तशीच अवकळा बर्वे गेल्याने पसरली आहे. त्यातून बाद झालेला खेळाडू त्रिफळा बाद झाला, झेल देऊन बाद झाला तर त्याला बाद केल्याचे श्रेय तरी प्रतिपक्षाला जाते; परंतु बरोबर खेळणाऱ्या निकृष्ट व अकर्तृत्ववान खेळाडूने नसलेली धाव घेण्यासाठी प्रयत्न करून चांगला खेळाडू मात्र धावबाद व्हावा म्हणजे त्या औदासिन्यातही मोठी शोकांतिका मिसळते. बर्वे धावबाद झाले आहेत. मृत्युला याचे सर्व श्रेय नाही. अवघड धाव घेण्याचे आमिष दाखवून त्यांच्याच पक्षातील खेळाडूंनी त्यांना बाद केले आहे.

मेननविरुद्ध बर्व्यांना ढकलण्यात आले. सामना कठिण होता. त्यांना कुणी मदत केली? सातारा, पुणे येथे सभा घेण्यापेक्षा मेनन-बर्वे मतदारसंघात सभा घेणे ही गोष्ट इंदिरा गांधी यांनी केली असती तर ? कामराजांना मेननना पाडण्यात स्वारस्य वाटले असते तर ? या गोष्टी झाल्या असत्या तर कदाचित बर्वे धावबाद होते ना !

परंतु या नियतीच्या खेळात कधीकधी धावबादही व्हावे लागते. दुसऱ्याच्या चुकीनेही व्हावे लागते. यमाचा हात वर गेला की, तंबूत परतावे लागते.

मेननना पाडून बर्वे थोर झाले नाहीत. लाचलुचपत, जातीयता यांच्याशी मुकाबला करू इच्छिणाऱ्या नंबुद्रीपाद किंवा अजय मुखर्जी यांच्या मंत्रिमंडळातही बर्वे यांना अग्रस्थान मिळाले असते. यामुळे ते मोठे होते.

बर्वे मंत्रिमंडळात होते तेव्हा त्यांना बाहेर काढण्यात आले. आता राज्यकारभारातील वशिलेबाजी, लाचलुचपत दूर करण्याच्या नवीन प्रतिज्ञा झडत आहेत. ईश्वर 'यांचे' रक्षण करो व बर्वे यांना सद्गती देवो !

— महेश

# मुक्ताफळे



## □ खुनाचा क्यू

खूप दिवसांपूर्वीची गोष्ट आहे. म्हणजे निवडणुकीपूर्वीची. प्रतापसिंग कैरों नावाचा पंजाब राज्याचा मुख्यप्रधान होता. पं. नेहरूंचा चार लाडक्या मंडळींतला हा एक. मेनन, पटनाईक व कैरों यापैकी पंडितजींचे अधिक प्रेम कुणावर होते, असा प्रश्न विचारला तर उत्तर देणे कठीण आहे ! अशा या कैरोंचा दिवसाढवळ्या खून झाला. कोण हा अधम ? कैरोंचा खुनी सूचासिंग होता व तो नेपाळला पळाला, असे जाहीर झाले. या खुनामागे नेहमीप्रमाणे कट असावा असा संशय पोलिसांना आला. खून झाला की कट आलाच ! गेली दोन वर्षे पंजाब व भारत सरकारचे ५० गॅझेटेड पोलिस अधिकारी, २०० नीच श्रेणी अधिकारी व ३,००० कॉन्स्टेबल्स या खुनाचा तपास करीत आहेत. ६,००० लोकांना चौकीवर नेऊन त्यांच्या जबान्या घेतल्या आहेत. या सर्व अधिकाऱ्यांच्या दोन वर्षांच्या पगाराचा हिशेब केला तर त्यात एक धरण सहज बांधून होईल, अशी टीका काही मूर्खांनी केली आहे. सूचासिंग नेपाळातून भारतात आणला गेल्याला आता कुठे वर्ष झाले आहे. तपास चालू आहे.

या तपासाला कंटाळलेल्या कैरोंच्या पत्नीला कॉंग्रेसने अखेर तिकीट दिले. त्या आता निवडून आल्या आहेत. त्या प्रकरणावरही लोक टीका करत आहेत; परंतु या लोकांच्या एक गोष्ट लक्षात येत नाही, की गृहखात्याने पूर्वी झालेल्या खुनाचा तपास पुरा होण्यापूर्वी जर कैरोंच्या खुनाचा तपास केला तर वशिलेबाजीचा आरोप गृहखात्यावर येईल. १९४८ साली महात्मा गांधींचा वध झाला त्याची चौकशी करणारे कमिशन सध्या महाराष्ट्रात जबान्या घेत आहे. या खुनात एक काय आहे, की मुख्य आरोपी फासावर लटकले आहेत. बाकिच्यांनी शिक्षा भोगल्या आहेत.

परंतु चौकशी पुरी झाली नाही. ती चालूच आहे. गृहखात्याकडे तर म्हणे लोकांचे असे अर्ज गेले आहेत की, वाल्या कोळी, अफझलखान, नारायणराव पेशवे

त्रिंबकजी डेंगळे यांच्याबद्दलही पुनः चौकशी केली पाहिजे. कदाचित वाल्या कोळी ' रामायण ' लिहिल्याने निर्दोषी ठरला हे चुकले असेल. कदाचित् अफझलखानाला दादोजी कोंडदेवानेच मारून आरोप फक्त छत्रपतींवर आला असेल. काही नक्की सांगता येत नाही.

परंतु इतक्या मागे जाणे गृहखात्याला शक्य नाही. निदान महात्मा गांधी खुनाचा तपास पूर्ण झाल्याखेरीज कैरॉंसारख्या नंतर खून झालेल्या प्रकरणांचा निकाल तरी पोलिसांनी लावू नये, हेच बरोबर आहे. ज्या अनुक्रमाने खून होतात त्याच अनुक्रमांनी चौकशा पूर्ण झाल्या पाहिजेत. नाहीतर लोकांना ' क्यू 'ची लागलेली सवय पुनः मोडायची !

## □ सोसायटी सुळसुळाट

जिल्हा परिषद वा को-ऑप. सोसायटचा या महाराष्ट्र सरकारच्या जनतेला देणग्या आहेत. उसाच्या चिपाडापासून जसा कागद तयार होतो, तसा विधानसभेसाठी उभ्या असलेल्या परंतु पडलेल्या उमेदवारांतून किंवा तिकीट न मिळालेल्या उमेद-वारांतून जिल्हा परिषदा 'तयार ' होतात. जिल्हा परिषदांच्या राज्यकारभाराचा परिचय जनतेला वेळोवेळी होतो. परंतु सरकारने स्थापन केलेल्या सोसायटचांचा परिचय जनतेला नाही. या सोसायटचांची नावे मोठी कल्पक असतात. ' पतितोद्धार लेबर को-ऑपरेटिव्ह सोसायटी ' किंवा ' अशोक-चक्र श्रमिक लेबर को-ऑप. सोसा-यटी ' अशा सुंदर नावाच्या सोसायटचांचे अध्यक्ष हे बहुधा संपूर्ण खादीधारी असतात. अशा एका सोसायटीचा अध्यक्ष योगायोगाने आम्हांला ' येष्टी 'त भेटला. या वेळी झालेला संवाद —

" काय, पुण्याला का ? "

" वय. "

" विशेष काम ?"

" आमच्या सोसायटीचा घ्योळ झालाय !"

" म्हणजे पतितोद्धार..लेबर . . . ?"

" ती मागंच बुडिवली. आता नवीन काढली आहे, ' दि अशोकचक्र श्रमिक ल्याबर कोपरेटिव्ह सोसायटी, "

" तुम्ही पहिलीचे अध्यक्ष होता ना ? "

" हिंचाबी मीच हाये ! "

" मग हिचं काय झालं ? "

" न्येहमीचंच. सरकारी काम घेतलं. सोसायटीतली माणसंच ब्येकार पघा, मधीच सोसायटी मोडली आणि आयला पाचसं रुपयांची सिमेंटची पोती घेतली. त्याचं पैसं भरा म्हून समन्स लागलं माझ्यावर. "

अध्यक्षांनी आपल्या जाकिटाच्या खिशातून काढलेला बदामी रंगाचा सरकारी कागद आम्हांला काही वाचवेना ! दोन कारणांनी. एक, अपवादात्मक अशी एक सोसायटी महाराष्ट्रात असावी याचे दुःख होऊन आमचे डोळे डबडबले होते व दुसरे तो बदामी कागद तर त्या सोसायटीच्या मेंबराहून बेकार होता ! आपलं वर लिहिलंय म्हणून कागद म्हणायचं !

महाराष्ट्रात अशी एखादी अपवादात्मक सोसायटी असली तरी महाराष्ट्र सरकारचा हा समाजवादी प्रयोग उत्तर प्रदेशाइतका फसलेला नाही हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

उत्तर प्रदेशात १९६१ साली २३,४९६ सोसायट्या होत्या. १९६६ साली ही संख्या ५१,००० झाली. यांतल्या १०,००० सोसायट्या १९५८ साली नेहरूंच्या वाढदिवशी त्यांना अर्पण करण्यात आल्या होत्या. म्हणजे नेमके काय केले कोणास ठाऊक ! असो. परंतु मुख्य गोम ही की यातल्या बहुतेक सोसायट्या फक्त कागदोपत्री होत्या. म्हणजे पहिली बुडाली, दुसरी बुडाली, तिसरी-चौथी चालू. तरी हिशेबाला कोसळल्या चार ! यातल्या काही शेतकऱ्यांच्या होत्या. १९६१ साली सरकारने ३६ लाख एकर जमीन कालव्याच्या पाण्याखाली आणली. १९६६ साली ६४ लाख एकर. परंतु कालव्यात अधिक पाणी न सोडता हे केल्याने घोटाळा झाला. धान्य उत्पादन घटले. सोसायट्या तर बुडाल्याच. परंतु निवडणुकीत काँग्रेस सरकारची सोसायटीही बुडाली.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारचे यश केवळ दैदिप्यमान. आपल्या समाजवादी प्रयोगाबद्दल महाराष्ट्र सरकार फार जागरूक आहे. सहकारी साखर कारखान्यांबाबत ना. चव्हाणांनी नुकताच इशारा दिला आहे तो याचसाठी. आतापर्यंत हे कारखाने राजकीय अड्डे नव्हते. तिथे फक्त सहकार होता. साखर होती. हे बदलले तर महाराष्ट्र सरकार सहन करणार नाही. विना सहकार नहीं उद्धार !

●

—ग्यानबा

---

जानेवारी १९६७ अखेर, कविता-साहित्य स्वीकृत केले असल्यामुळे, साप्ताहिक 'माणूस'कडे येणाऱ्या यापुढील कवितांची दखल घेणे वेळेअभावी शक्य होणार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही साहित्यासोबत पुरेसे टपाल नसल्यास त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करता येणार नाही. कृपया या अडचणीची नोंद घेतली जावी. —सं.

---

समीर
# विचार वारे

## □ आजचा जपान

थोड्याच काळापूर्वी बराच मागासलेला असलेला एखादा देश एकदम भौतिक उन्नतीच्या शिखरावर पोचला तर त्याच्या सांस्कृतिक अंतरंगात काय उलथापालथ होते व जीवनाच्या पारंपरिक मूल्यांबद्दल त्याला काय वाटते हे पाहायचे असेल तर जपानसारखे उदाहरण मिळणार नाही. एक नामवंत जपानी कवयित्री व सैफी विश्व-विद्यालयातील समाजशास्त्राच्या प्राध्यापिका कु. काझुको त्सुसमी थोड्या दिवसां-पूर्वी भारताचा दौरा करून गेल्या, तेव्हा त्यांनी आधुनिक जपानच्या अंतरंगावर बराच प्रकाश टाकला.

आधुनिक भारत व आधुनिक जपान यांच्यांतला सर्वांत मोठा फरक म्हणजे भार-तात अजूनही जुने खूप टिकून राहिले आहे. येथल्या खूपच समृद्ध परंपरा जतन करण्यात आल्या आहेत. जपानमध्ये पारंपरिक मूल्यांचा जो सतत ऱ्हास चालला आहे, त्याला केवळ औद्योगीकरण जबाबदार आहे असे म्हणता येणार नाही. "जपानमध्ये मैजी कालखंडात 'राजा हा देवाचा अवतार आहे.' असल्या परंपरा-गत व बुद्धिविरोधी समजुतीनेही औद्योगीकरणाला व आधुनिक, बुद्धिवादी मूल्यांच्या जोपासनेला पाठिंबा दिला होता. याचा परिणाम असा झाला की, दुसऱ्या महा-युद्धाच्या काळापर्यंत जपानमध्ये जुनी व नवी मूल्ये यांचे सहजीवन चालू होते व त्यामुळे आधुनिक जपानी माणूस अर्धवट दोन्हीकडचा झाला."

आजचा जपान हा अनुकरणाच्या पूर्णपणे आहारी गेलेला देश आहे. जपानी उद्योगधंद्यांतच नव्हे तर जपानी संस्कृतीतही ही अनुकरणप्रियता दिसून येते. आज जपानमध्ये जो जो बदल घडताना दिसून येतो, तो आंतरिक प्रेरणेने घडत नसून अनुकरणाच्या लालसेने घडत आहे. उदाहरणार्थ, बायकांच्या पोषाखात अमेरिकेचे अनुकरण होत नाही. अमेरिकेनंतर फ्रेंच फॅशन आली व आता तीही मागे पडून इटालियन फॅशन आली आहे. "जपानमधल्या बऱ्याच तरुण स्त्रियांना परंपरागत जपानी पोषाख 'किमोनो' कसा घालावा हे माहीत नाही." नाट्यक्षेत्रातही परंपरा-गत नाटक व आधुनिक नाटक यांची अगदी भिन्न विश्वे झाली आहेत व त्यांचा रसिकवर्गही अगदी वेगवेगळा असतो.

मैजी काळातल्या एका प्रसिद्ध लेखकाने जपानी समाजावर प्रभाव पाडणाऱ्या देशी व विदेशी जीवनमूल्यांची चर्चा करून त्यासाठी विदेशी मूल्ये जपानने अधिक

स्वीकारली आहेत, असे म्हटले आहे. उलट, हिंदुस्थान आधुनिक काळातही अंतर्मुख झालेला दिसतो. याचे मुख्य कारण जनतेवर धर्मभावनेचा प्रभाव हे असावे. अर्थात भारतातही अनुकरण असेलच पण जपानइतके नाहीं. योशीहाटा नावाचा एक जपानी कादंबरीकार मागे भारतात आला होता व त्याने 'मी भारतात काय पाहिले,' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. त्यात त्याने परंपरा-जोपासनेच्या बाबतीत भारत जपानहून श्रेष्ठ आहे, असे म्हटले आहे. " भारतात अजून परंपरेला महत्त्व आहे ही जपानच्या दृष्टीने चांगली गोष्ट आहे. भारतात औद्योगीकरण येऊन ठेपले की येथली जनता जुन्या-नव्यांचा समन्वय कसा साधणार आहे हे पाहण्याची जपानला उत्सुकता आहे. भारतात समाज-जीवनाची परंपरा आहे त्याचप्रमाणे व्यक्तिमाहात्म्याचीही परंपरा दिसते. त्यामुळे बुद्धिविरोधी परंपरा व बुद्धिप्रधान आधुनिकता यांची सांगड घालणे आधुनिक भारतीयाला शक्य होऊ शकेल. हिंदुस्थानचा हा समन्वय जगाला बोधप्रद होऊ शकेल. "

## □ शेतकीविषयक संशोधनाची आवश्यकता

भारताने धान्य-उत्पादनाचे जे बरेच वरचे उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेवले आहे. तें साध्य करायचे असेल तर देशात शेतकीविषयक संशोधनाला वाहिलेली प्रादेशिक केंद्रे स्थापन झाली पाहिजेत; कारण शेतकीविषयक प्रगतीची ही पुढची पायरी आहे, असे मत भारतभेटीला आलेल्या एका अमेरिकन तज्ज्ञाने नुकतेच प्रकट केले. हे तज्ज्ञ म्हणजे डॉ. फिलिप रॉय असून ते मिनेसोटा विश्वविद्यालयाचे नामांकित शेतकीविषयक अर्थशास्त्रज्ञ आहेत. ते म्हणाले, जे प्रत्यक्ष जमीन कसतात त्यांचा अशा संशोधनाशी संबंध नसेल तर ते संशोधन म्हणजे पैशाचा व वेळेचा अपव्यय आहे. म्हणून " केंद्रीय संस्था म्हणून प्रत्यक्ष शेताच्या परिसरात संशोधन-केंद्रे उभारली पाहिजेत.".

शेतीच्या क्षेत्रात अप्रगत राष्ट्रांनी प्रगत देशांची उसनवारी करणे धोक्याचे ठरू शकते. याचे सहज लक्षात येणारे उदाहरण म्हणजे सुटया भागांची व्यवस्था न करता ट्रॅक्टर आयात करणे किंवा प्रभावी जंतुनाशक द्रव्ये जवळ नसताना रासायनिक खताची आयात करणे. अर्थात् हिंदुस्थानात आता ही परिस्थिती राहिलेली नाही; कारण आता या देशांत शेतीची अवजारे, खत व जंतुनाशक द्रव्ये तयार होत असतात. पण भारतात एका गोष्टीची उणीव आहे व ती म्हणजे शेतकऱ्यांना उत्तेजन देणारे धोरण नाही. जमीन मालकी, धान्याची किंमत, कर, कर्ज मिळण्याची सवलत, ग्राम-कल्याण इत्यादी सर्व विषय समजावून देणारे उत्तेजक धोरण आखण्यात आले तर त्याचा फारच उपयोग होऊ शकेल. पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट निदान सध्यातरी म्हणजे खेडेगावांत काम मिळण्याची सोय करणे. लोकांना ज्या योजनामुळे शेती सोडून उद्योग-धंद्यात उपजीविका शोधावी लागेल, अशा योजना आखणे सध्यातरी अगदीच अव्यवहार्य ठरेल.

●

# उर्दू वार्ता

संकलन : हिदायतखान

## ☐ निझामची खरी दौलत !

हैद्राबादचे शेवटचे निझाम मीर उस्मान अली खान यांचे नुकतेच देहावसान झाले. निझामसाहेबांच्या कारकीर्दीत आर्थिक संपन्नता व अन्नधान्याची सुबत्ता तर होतीच; शिवाय भाषा, संस्कृती व कला यांचीही उत्तम जोपासना केली गेली होती.

विशषतः, उर्दू भाषेत वैज्ञानिक व तांत्रिक ग्रंथ निर्माण व्हावेत, म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले. तद्वतच उर्दूतील 'एन्सायक्लोपिडिया' ही तर उर्दू वाङमयाला त्यांची अमोल देणगी आहे. निझामसाहेब मोंगल संस्कृतीचे पुरस्कर्ते असले तरी हिंदु-मुस्लिम ऐक्याची महती त्यांनी कधीच नजरेआड केलेली नव्हती. भाषेबाबत-देखील त्यांचा दृष्टिकोन विशाल असाच होता आणि म्हणूनच उस्मानिया युनिव्हर्सिटीत शिक्षणाचे माध्यम उर्दू करण्यात आले, तेव्हा म. गांधी वगैरे राष्ट्रीय नेत्यांनी त्याचे स्वागतच केले होते !

'इन्क्लाब' (मुंबई), ४–३–६७

## ☐ स्वातंत्र्य की स्वैराचार ?

पाश्चात्त्य संस्कृतीचे गोडवे आम्ही नेहमी गातो. तिचे अंधानुकरण करण्यात धन्यता मानतो. पाश्चिमात्त्य देशही जगातील स्त्रियांचा सर्वप्रथम आम्हीच उद्धार केला, असा डांगोरा सदोदित पिटत असतात. परंतु जरा डोळे उघडून तिकडे पाहिल्यास काय दिसते ? स्त्री–स्वातंत्र्याच्या नावाखाली चाललेला नंगानाच !

एका पाश्चात्त्य शिक्षण-तज्ज्ञानेच म्हटले आहे की, " Liberty is not a Licence ! "

आणि प्रत्यक्षात मात्र हे तथाकथित पुरोगामी देश स्वातंत्र्याला स्वैराचाराचेच हीन स्वरूप देऊ लागले आहेत !

व्यभिचाराचे अड्डे असलेले नाईट क्लब्स, उत्तान चित्रपट, वाढते घटस्फोट... इत्यादी ही सारी सुधारणाच का ?

सध्या हे देश प्रगतिपथावर आहेत, म्हणून बाह्यतः दिसणारी ही सुदृढता त्यांना 'बाळसे' वाटते, परंतु ही 'सूजच' नव्हे काय ? हे संस्कृती–संवर्धन आहे की अधःपतन ?

'दावत' (दिल्ली), १–३–६७

## □ खरोखरीच सुवर्ण–अक्षरात !

'...इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिले जाईल !' इत्यादी शब्दांत आपण जे एखाद्या गोष्टीविषयी बोलतो, ते लाक्षणिक अर्थाने, त्या गोष्टीचे माहात्म्य सिद्ध व्हावे म्हणून ! परंतु पाकिस्तानच्या कौन्सिलने कुराणाचे लिखाण विशिष्ट अशा हिरव्या रेशमी वस्त्रावर खरोखरीच्या सुवर्णाच्या तारांनी करण्याचा अभूतपूर्व कार्यक्रम हाती घेतला आहे.

हे जिकिरीचे व जोखमीचे कार्य करण्यासाठी खास शिक्षण घेतलेल्या तज्ज्ञाची नियुक्ती करण्यात आली असून प्रस्तुत ग्रंथ मूळ कुराणाबरहुकूम असेल.

हा 'सुवर्णग्रंथ' येत्या रमझान ईदपर्यंत पूर्ण होईल, असा आत्मविश्वासही ह्या तज्ज्ञाने व्यक्त केला आहे !

'इन्कलाब' (मुंबई), १–३–६७

## □ क्लेचा क्लेष

जागतिक मुष्टीयुद्ध संघटनेने महंमदअली क्ले यास जगातील सर्वश्रेष्ठ 'हाय वेट बॉक्सर' म्हणून नुकतीच मान्यता दिली आहे.

गेल्या दोन वर्षांपासून त्याचं हे श्रेष्ठत्व या कारणास्तव नाकारलं जात होतं की तो सिया मुस्लिम आहे व त्यामुळे अमेरिकन तरुणांपुढं एक आदर्श उदाहरण म्हणून त्याला उभा करणं वाजवी ठरणार नाही ! परंतु शेवटी क्लेने नुकताच आर. बी. ट्रेलचा पराभव केल्यानंतर सदर संघटनेला त्याचं श्रेष्ठत्व मान्य करून जगज्जेता मुष्टीयोद्धा म्हणून जाहीररीत्या मान्यता देणे भाग पडले आहे.

अमेरिकेचे हे धोरण जसे खिलाडू वृत्तीला काळिमा फासणारे आहे, तसेच परवाच्या विजयानंतर क्लेने पत्रकारांजवळ काढलेले उद्‌गारही एका खेळाडूला न शोभणारे असेच आहेत—

क्ले म्हणाला, " एखादा मुस्लिम जर माझ्यापुढं प्रतिस्पर्धी म्हणून उभा ठाकला तर मी त्याच्याशी न लढताच त्याला माझे स्थान बहाल करीन ! "

खरं म्हणजे खेळाडू, कलावंत इत्यादी असामान्यांनी जातिजमातींचा क्षुद्र भेदभाव मानू नये ! उलट आपल्या खेळानं, क्लेनं इतरांच्या मनांतील जातीयवादाचा विचार नष्ट करण्याचा प्रयत्न करावयास हवा ! 'उर्दू टाइम्स' १६–२–६७

●

खा स वा र्ता प त्रे

'माणूस' प्रतिनिधीकडून

# बिहार दुष्काळग्रस्त आहे...

निवडणुकांची धामधूम चालू होती तेव्हाही 'माणूस'चे लक्ष होते बिहारकडे. तिकडे उडालेल्या भुकेच्या आकांताकडे. पण निवडणुकाही टाळता येत नव्हत्या. तो विषय शक्य तितक्या वस्तुनिष्ठ पद्धतीने 'माणूस'-ने वाचकांसमोर ठेवला. यातून मोकळे होताच 'माणूस'ने आपला खास प्रतिनिधी बिहारकडे तातडीने रवाना केला. प्रतिनिधीचा दौरा सुरू आहे. रेल्वे-बस-बैलगाडी-पायी असा सर्व तऱ्हेचा प्रवास आहे. दुष्काळी परिस्थितीची शक्य तितकी व्यापक व शक्य तितकी जवळून पाहणी व्हावी हा उद्देश. या पाहणीवर आधारित खास वार्तापत्रे या अंकापासून सुरू होत आहेत. पोस्ट खात्याने दगा दिला नाही तर वार्तापत्रे क्रमशः यावीत, अशी योजना आहे. *– संपादक*



# शहर पटना मजेत आहे...

जराजीर्ण शरीराची भुकेली माणसे रस्त्यातून हिंडताहेत. काही फूटपाथवर पडून शेवटचे श्वास मोजताहेत. भयानक चेहरे. कोल्ही कुत्री–

दुष्काळाची ही कल्पना. बिहारच्या तीव्र दुष्काळाच्या बातम्या वाचून आणि १९४१ च्या बंगालच्या दुष्काळाचे अहवाल वाचून हे चित्र अधिक दृढ झाले होते, पण पटना शहरात उतरलो तेव्हा धीर आला. यांपैकी काहीही नव्हते. उलट दिसले तजेलदार चेहरे, झळाळी, बेफिकिरी आणि सुखासीनता. चला, म्हणतात तसा काही फार मोठा दुष्काळ दिसत नाही.

उगाच तर आलो नाही ना, अशी रुखरुख लागल्यासारखी झाली. दुष्काळाची पाहणी करण्यासाठी आलो आहे, असे सांगितले की ऐकणारे लोक कुतूहलाने माझ्याकडे बघून विचारीत,–

"आपण एवढ्या दुरून आलात?"

"हो, दुष्काळही तेवढाच मोठा आहे ना?"

पटन्यामध्ये उतरल्यापासून या प्रश्नोत्तरांनी मी बेजार झालो होतो. बिहारातील दुष्काळाची पाहणी करण्यासाठी येऊन गेलेल्या एका ऑस्ट्रेलियन पत्रकाराने मला हेच सांगितले. राजकारणाच्या धाईगर्दीपुढे पटना शहरातील सुखवस्तू लोकांना दुष्काळाची झळ तर पोचलेली दिसत नाहीच; पण त्याच्या गंभीरतेची तीव्र जाणीवही दिसत नाही. जयप्रकाश नारायणांची आणि दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी अविरत खपणाऱ्या इतर संस्थांची मदतीची आवाहने देशातील इतर प्रांतांमधील वृत्तपत्रांमध्ये झळकत असताना पटन्यातील साऱ्या वृत्तपत्रांत खळबळजनक राजकीय बातम्यांच्या गर्दीमुळे दुष्काळाच्या वार्तांना क्वचितच स्थान मिळते. पटना शहरात सरकारी कचेऱ्यांत वरवर दिसणारी बेपर्वाई, संथपणा आणि पटनावासीयांची सुखासीनता, हॉटेलांमध्ये भरभरून मिळणारे पदार्थ, एकमेकांना होणारा खाण्याचा आग्रह हे सारे पाहिले, की एकदम वाटू लागते. "बिहारमध्ये खरोखरच दुष्काळ

आहे ना? का उगाचच भयानक दुष्काळाच्या वावड्या उठत आहेत?"

पटन्याच्या अ. ना. सिन्हा इन्स्टिटयूट ऑफ सोशल स्टडीजचे संचालक डॉ. डी. के. दासगुप्ता यांच्याजवळ भीत भीत मी ही शंका व्यक्त केली, तेव्हा कडवटपणे ते म्हणाले, "निवडणुकीपुढे आणि राजकारणापुढे एवढे मोठे संकट विसरले जावे हे दुर्दैव आहे. आणि साहजिकच आहे. निवडणुकीचे धक्के मोठ्या माणसांना बसतात तर दुष्काळाचे चटके सामान्यांना. त्यांच्याकडे कोण लक्ष देतो?"

## ६५ लाख टनांची तूट

परंतु बिहारात दुष्काळ आहे. गेल्या शंभर वर्षांत बिहारने पाहिला नव्हता एवढा भयानक दुष्काळ बिहारात यंदा पडला आहे. बिहारच्या सुमारे सव्वापाच कोटी लोकसंख्येपैकी सव्वाचार कोटी लोकवस्तीवर दुष्काळाची ही भीषण छाया पसरली आहे. अन्नाच्या दाण्यादाण्यासाठी आणि पाण्याच्या थेंबासाठी कैक लोकांना वणवण हिंडावे लागत आहे. कंदमुळे खात, कचऱ्याच्या ढिगाऱ्यांत फेकलेल्या वस्तू उचलून त्यावर आपले जीव जगवावे लागत आहेत. बिहार सहायता समिती, बिहार सरकार आणि इतर सामाजिक आणि धार्मिक संस्था या लोकांच्या मदतीसाठी धावून गेल्या नसत्या तर अनेक मूकबळी पडले असते, अशी परिस्थिती आहे. पटन्याच्या वातावरणात दुष्काळाच्या भयानकतेची कल्पना येत नाही एवढेच. आता उन्हाळा जवळ येत आहे. हिवाळी पीक केव्हाच जळून गेले आहे. आता तर बिहारातील नद्या-नालेदेखील कोरडे पडू लागले आहेत. येते सात-आठ महिने बिहारच्या दृष्टीने अत्यंत आणिबाणीचे आहेत.

तशी दरवर्षी बिहारमध्ये कोणत्या ना कोणत्या जिल्ह्यात नापिकी असतेच. दर चार-पाच वर्षांआड एकदम पाच-सहा जिल्ह्यांत नापिकी होऊन दुष्काळाची ओरड होते; पण यंदा मात्र जवळ जवळ सर्व बिहारमध्ये पावसाने नावापुरते तोंड दाखवले आणि काही जिल्ह्यांमध्ये तर विहिरींत पाणी झिरपण्यापुरताही पाऊस आला नाही. बिहरमधील मुख्य पिके तांदूळ, गहू व मका. यंदा पावसाच्या अभावामुळे एकूण १ कोटी १९ लाख एकरांत तांदूळ येतो. त्यांपैकी ४० एकराच्या वर जमिनीत तांदूळ पेरलाच गेला नाही. उरलेल्या ठिकाणी पेरलेला तांदूळ उगवलाच नाही, तर जिथे उगवला तिथे काही दिवसांनी जळून गेला. काही जिल्ह्यांत नद्यांच्या किनाऱ्याने चांगली पिके आली होती. पण दुर्दैवाने ऑगस्ट १९६६ च्या शेवटच्या आठवड्यात बिहारमधील नद्यांना आलेल्या पुरामुळे सुमारे साडेएकोणीस लाख एकरांमधील पिके वाहून गेली आणि परिणामतः बिहारात दरवर्षी तांदूळ, गहू, मका मिळून सुमारे ७३ लाख टन धान्य निपजत होते, त्याऐवजी यंदा फक्त २० ते २१ लाख टन धान्य निघाले! बिहार हे गरजेपेक्षा अधिक धान्य पिकवणारे राज्य नव्हे. गेल्याच वर्षी करण्यात आलेल्या पाहणीनुसार बिहारची दर वर्षाची गरज ८६ लाख टन धान्याची असते. म्हणजे यंदा बिहारात ६४ ते ६५ लाख टन धान्याची

तूट आहे ! येत्या सात-आठ महिन्यांत बिहारमधील लोकांना जगविण्यासाठी एवढे धान्य बाहेरून पुरवायचे आहे.

बिहारची जमीन उत्कृष्ट आहे. गंगा, शोण, गंडक अशा मोठमोठ्या नद्या बिहारमधून वाहतात. बी पेरलं की बाकीचं काम जमीन करते. असं असताना बिहारमध्येच हे दुष्काळाचे दुखणे पुन्हा पुन्हा का उठते ? दोन कारणे सांगितली जातात– एक म्हणजे पावसाची अनिश्चता आणि दुसरे म्हणजे सरकारने नद्यांचा शेतीसाठी उपयोग करण्याकडे केलेले दुर्लक्ष. जंगलांची भरमसाट कत्तल झाल्यामुळे गेल्या वीस-पंचवीस वर्षांत बिहारमध्ये पाऊस असाच शिवाशिवीचा खेळ खेळत असतो.

आणि बहुसंख्य बिहारी शेतकऱ्यांची सारी मदार वरुणराजावर आहे. बिहारमधील चार कोटी ऐंशी लाख एकर भूमीपैकी जंगले, चराईची राने सोडून सुमारे पावणेतीन कोटी एकरांत शेती होते. त्यांपैकी अवघ्या अठरा लाख एकरात बागायती शेती होते. बिहारसारख्या सुपीक आणि नद्यांच्या सुकाळ असलेल्या सपाट प्रदेशाच्या राज्यात जलसिंचित शेतीचे एवढेच प्रमाण आहे. १८–२० वर्षांपूर्वी भूसिंचनाचा एक मास्टर प्लॅन बिहार राज्यासाठी तयार करण्यात आला होता. पण तो अद्याप धूळ खात पडून आहे. " हा दुष्काळ हा आमच्या कर्माचंच फळ आहे. आम्ही दुर्लक्ष केलं म्हणून असं झालं, " असे काही बिहारी कडवटपणे म्हणतात ते यामुळंच !

परंतु बिहारी सेक्रेटरीएटमधील एका उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यांचे मत मात्र वेगळे आहे. त्यांचे म्हणणे असे की, बिहार राज्याची भूसिंचनाचा क्षमता वरवर फार मोठी दिसत असली तरी ती फसवी आहे; कारण पाऊस आला नाही म्हणजे बिहारातील दक्षिणेकडून येणाऱ्या साऱ्या नद्या आटतात, कोरड्या ठणठणीत पडतात. नद्या आटल्या तर त्यांच्या कालव्यांना पाणी कोठून येणार ? तरी ही क्षमता महाराष्ट्र राज्यापेक्षा जास्त आहे. महाराष्ट्रात आहे त्या साधनांचा भूसिंचनासाठी जसा कल्पकतेने उपयोग झाला आहे, तसा बिहारमध्ये होत नाही हे खरे आहे.

बिहारात दक्षिणेकडून वाहत येऊन गंगेला मिळणाऱ्या शोण आदी नद्यांना ' भूसलीला ' म्हणतात. त्या आटल्या तरी त्यांच्या पात्रात थोडे खणले की लगेच पाणी मिळते. पण यंदाची परिस्थिती इतकी भीषण आहे की, या अटलेल्या प्रवाहात खणले तरी पाणी सापडत नाही.

## आळस, आराम

आणखी एक कारण सांगितले जाते. स्वत: बिहारी लोकच सांगतात की आमचा शेतकरी फार आळशी आणि अव्यवस्थित आहे. अजून खेड्यांमध्ये मी गेलो नसल्याने बिहारी शेतकऱ्यांच्या आळशीपणाबद्दल मला विशेष काही सांगता येणार नाही. पण त्यांच्या शहरवासीय बांधवांच्या गबाळेपणाकडे पाहिले तर याही म्हणण्यात तथ्य असावे असे वाटू लागते.

प्रवासात एक बिहारी शेतकरी मला भेटला. तो म्हणत होता, आमच्याकडची शेती एवढी चांगली आहे की चांगला पाऊस आला की आमच्या साऱ्या घराला दोन वर्षं पुरेल एवढं धान्य साठवून ठेवतो. आणि दुसऱ्या वर्षी साधारण आरामच करतो ! अर्थातच या शेतकऱ्याला सर्व बिहारी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी मानता येणार नाही.

पण एक मात्र खरं बिहारी शेतकरी अतिशय सहनशील आहे. तो फक्त संध्या-काळीच–दिवसातून एकवेळ–जेवतो, आणि अशा दोन-तीन संध्याकाळी अन्नाशिवाय गेल्या तरी त्याच्या चेहऱ्यावर उपासाचा लवलेशही दिसत नाही. रिलीफ कमिटीचे कार्यकर्ते तसे सांगतात.

बिहारच्या सव्वापाच कोटी लोकसंख्येपैकी ७७ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. आणि एकूण लोकसंख्येच्या सुमारे ४५ टक्के लोक भूमिहीन शेतमजूर आहेत. एकूण शेतकऱ्यांपैकी पाच एकरांपेक्षा कमी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या १५ टक्के आहे आणि या लोकांवरच दुष्काळाची कुऱ्हाड प्रथम कोसळते आहे. या सव्वाचार कोटी लोकांना प्राणसंकटातून वाचविण्यासाठी धान्य, कपडा पुरवण्याचे प्रचंड कार्य बिहार सरकार, बिहार रिलीफ कमिटी आणि इतर सामाजिक संस्था करीत आहेत. बिहारमध्ये सुमारे १ कोटी ९ लाख पाळीव जनावरे आहेत. त्यांच्यासाठीही सात कोटी टन चाऱ्याची व्यवस्था करायची आहे. काम अतिशय प्रचंड आहे. एकट्या सरकारच्या किंवा कोणत्याही एका संस्थेच्या ते आवाक्याबाहेरचे आहे.

युद्धप्रयत्नांसारख्या तयारीने बिहार सरकारने दुष्काळपीडितांच्या साहाय्यासाठी अनेक योजना घोषित केल्या आहेत. अडीच लाख कच्च्या विहिरी खोदणे, शेत-कऱ्यांना डिझेल आणि विजेचे पंप पुरविणे, ट्यूब विहिरी खोदण्यासाठी शेतकऱ्यांना मदत देणे, नद्यांवर पंप बसविणे, छोट्या नद्यांना कच्चे बंधारे घालणे आदी कामे बिहार सरकारने मोठ्या प्रमाणावर सुरू केली आहेत. पण आज पाटण्यामध्ये नव्या राजकीय परिस्थितीच्या खालोखाल दुसऱ्या कोणत्या विषयाची चर्चा होत असेल तर ती वेगवेगळ्या सरकारी खात्यांतील लाचलुचपतीची आणि भ्रष्टाचाराची. आणि धक्का देणारी गोष्ट म्हणजे सरकारच्या दुष्काळपीडित साहाय्य कार्यामध्येही लाच-लुचपत आणि भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर घुसला आहे. या भ्रष्टाचाराचे प्रमाण एवढे वाढले आहे की, श्री. जयप्रकाश नारायण यांच्या बिहार रिलीफ कमिटीने काढलेल्या एका निवेदनातही त्याची दखल घ्यावी लागली आहे. आणि सिन्हा इन्स्टिटयूटच्या काही संशोधकांनी बिहारमधील दुष्काळग्रस्त भागांची नुकतीच जातीने पाहणी केली व अहवाल सादर केला. आपल्या अहवालातला मोठा भाग त्यांनी या भ्रष्टाचारावर टीका करण्यात आणि त्याला आळा कसा घालावा हे सुच-विण्यातच खर्च केला आहे. दुष्काळपीडितांना पैसे वाटण्यात, दुष्काळी कामावर असलेल्या मजुरांना मजुरी देण्यात, रेशनचे धान्य वाटताना, कर्जवाटप करताना

सरकारी अधिकारी भयंकर अन्याय आणि लज्जास्पद भ्रष्टाचार करतात, असे या संशोधकांना आढळून आले आहे. आधीच बिहारची राज्ययंत्रणा ही भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमतेने बुजबुजलेली आहे. त्यात हा प्रकार. दुष्काळ निवारण कार्यातील या भ्रष्टाचाराविषयी बोलणारे लोकही अगदी सहजगत्या बोलतात. भ्रष्टाचाराची त्यांना सवय झाली आहे. त्यामुळे त्यांना एकदम संताप येत नाही. दुष्काळ निवारणाच्या कार्यात तरी असे होऊ नये याची फक्त हळहळ तेवढी ते व्यक्त करतात. बाहेरून—विशेषत: महाराष्ट्रातून—येणाऱ्या माणसाला हा प्रकार पाहून हसावे की रडावे तेच समजत नाही. नवे काँग्रेसविरोधी सरकार आता बिहारात आले आहे. आता पाहू या काय होते ते, अशा वृत्तीत सारेजण आहेत !

## चहूकडून मदत

श्री. जयप्रकाश नारायण यांनी स्थापन केलेली बिहार रिलीफ कमिटी, कॅथॉलिक मिशन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने स्थापन केलेली बिहार अकालपीडित सहायता समिती, मारवाडी रिलीफ सोसायटी, रामकृष्ण मिशन आणि अशा आणखी छोट्या मोठ्या संस्था मात्र मोठ्या प्रामाणिकपणाने जीव तोडून काम करीत आहेत. मी या साऱ्या संस्थांच्या पटन्याच्या कचेऱ्यांमध्ये गेलो. ठिकठिकाणांहून आलेली धान्याची पोती, कपड्यांचे गठ्ठे, दूध पावडरींचे डबे वाहनांची वाट पाहत पडलेले दिसत होते. कार्यकर्त्यांची धावपळ दिसत होती. वाहनांची ये-जा चालू होती.

दुष्काळपीडित सहायता कार्य करणारी सर्वांत मोठी संस्था म्हणजे बिहार रिलीफ कमिटी. कमिटीची कचेरी पटन्याजवळच सदाकत आश्रमात आहे. जयप्रकाश नारायण हे कमिटीचे अध्यक्ष आहेत. जे. पी. (जयप्रकाश) हा पाटण्यात आणि बिहारमध्ये परवलीचा शब्द आहे. एखाद्या स्वयंपूर्ण कचेरीच्या धर्तीवर श्री. जयप्रकाशांनी या कमिटीचे काम चालविले आहे. बिहारमध्ये भूदानासाठी हिंडत असताना काही ठिकाणी दिवस दिवस न जेवलेली माणसे जे. पीं. ना दिसली. आगामी दुष्काळाच्या भीषणतेची त्यांना एकदम कल्पना आली आणि त्यांनी आपला पुढचा सारा वेळ दुष्काळासाठी घालवायचे ठरविले. ऑक्टोबर १९६६ मध्येच त्यांनी या कमिटीची स्थापना केली. बिहारच्या मुख्यमंत्र्यांचे, प्रधानमंत्र्यांचे दुष्काळाकडे लक्ष वेधले आणि तत्काळ मदतकार्याला सुरुवात केली. बिहारात या दुष्काळात अजून विशेष भूकबळी पडले नाहीत याचे बरेचसे श्रेय आहे जयप्रकाशांनाच. कमिटीतर्फे फंड आणि धान्य मिळविण्यासाठी ते सतत चोवीस तास सध्या झटत आहेत. विद्यार्थ्यांसाठी, उद्योगपतींसाठी, व्यापाऱ्यांसाठी, स्त्रियांसाठी अशी रोज वेगवेगळी निवेदने ते काढीत आहेत.

रिलीफ कमिटीचे मुख्य काम आहे ज्या ठिकाणी अन्न नाही त्या ठिकाणी प्रथम अन्न पोचवून त्या ठिकाणच्या लोकांची उपासमार थांबविणे. त्यासाठी कमिटीने दुष्काळग्रस्त भागात एक हजारच्यावर मुक्त जेवणगृहे काढण्याचे ठरविले असून

त्यांपैकी साडेचारशे जेवणगृहे आतापर्यंत चालूही झाली आहेत. धडधाकट माणसे दुष्काळी कामांवर मजुरी करून पैसे मिळवून धान्य विकत घेऊ शकतात. पण जे मजुरी करायला लायक नाहीत, अशी मुले व वृद्ध स्त्री-पुरुष यांना कुणीच वाली नसतो. उपासमारीमध्ये यांचा बळी प्रथम पडतो. त्यांच्यासाठी ही मुक्त जेवणगृहे चालविण्यात येतात. एका जेवणगृहात पाचशेच्या वर मुले, स्त्री-पुरुष जेवतात. याशिवाय साध्या धान्याचे, कपड्याचे वाटप करणे हीही कामे कमिटी करते. लहान मुलांच्या दुधाचीही व्यवस्था कमिटीतर्फे होते.

याशिवाय पाटन्याच्या कॅथॉलिक मिशनचेही प्रचंड प्रमाणावर सेवाकार्य चालू आहे. डनलॉप रबर कंपनी, ऑक्स्फोर्ड कमिटी फॉर फॅमिन रिलीफ, केअर आणि देशविदेशांतल्या वेगवेगळ्या मिशनरी संस्था यांच्या मदतीने लहान मुलांना सत्त्वान्न पुरविण्याचे, मुक्त जेवणगृहे चालविण्याचे आणि दुष्काळी कामे आपणहून सरकारच्या संमतीने चालविण्याचे प्रचंड कार्यही ह्या संस्था करीत आहेत. टय़ूब विहिरी खोदून देण्यासाठीही ही संस्था मोठ्या प्रमाणावर मदत करीत आहे.

गया जिल्ह्यातील नवाद विभागात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचेही टय़ूब विहिरी खोदण्याचे कार्य चालू आहे. मुख्य म्हणजे स्वयंसेवक संघाची आठ ते बारा वर्षांची मुलेच या विहीर खोदण्याच्या कामात गुंतली आहेत. आतापर्यंत या विभागात सुमारे चाळीस विहिरी संघाच्या कार्यकर्त्यांनी खोदल्या आहेत. त्याशिवाय गुरांच्या चाऱ्याचे वाटप, अन्न, वस्त्र आणि औषधी यांचे वाटप ही कामेही स्वयंसेवक करीत आहेत. संघाच्या शिस्तबद्ध कामाची तारीफ स्वत: जयप्रकाशांनीही केली आहे.

बिहारात दुष्काळ आहे याची जाणीव पटन्यात होते ती या संस्थांच्या कार्यालयांमध्ये किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांना भेटल्यावरच. एरवी नाही. आणखी खूप काम झाले पाहिजे, खूप कार्यकर्ते हवे आहेत, असे सारेच म्हणतात.

श्री. जयप्रकाश नारायण अत्यंत गडबडीत होते, तेव्हाच मी त्यांना भेटलो. नुकत्याच ब्रिटिश हायकमिशनरच्या पत्नी बिहार रिलीफ कमिटीच्या कार्यालयाला भेट देऊन गेल्या होत्या. मी त्यांना विचारले, "आपणांला कशा तऱ्हेचे कार्यकर्ते हवेत?"

## कार्यकर्त्यांकडून अपेक्षा

श्री. जयप्रकाश म्हणाले, "खरे म्हणजे महाराष्ट्रासारख्या दूरच्या प्रदेशांतून कार्यकर्त्यांनी इथे येऊन काम करावे, असा आमचा भर नाही. ज्यांना कामे करायची इच्छा आहे ते तिथेही फंड गोळा करण्याचे, धान्य गोळा करण्याचे काम करू शकतात."

"इतकेही करून काही तळमळीच्या कार्यकर्त्यांना इकडे येऊन काम करण्याची इच्छा असली तर?"

"तर पटन्यापर्यंतचा जाण्यायेण्याचा खर्च त्यांना स्वत:चा करावा लागेल. इथला

त्यांचा राहण्याचा खर्च व वाहनाचा खर्च कमिटी करील. आमची जेवणगृहे दूर-दूरच्या ठिकाणी चालतात. आता उन्हाळा जवळ आला आहे. इकडचे हवामान कार्यकर्त्यांना सहन व्हायला हवे. कठीण परिस्थितीत दिवस काढायची तयारी हवी आणि प्रत्येक कार्यकर्त्याने इथे कमीत कमी तीन महिने तरी राहायला हवे. तर त्याच्या येण्याचा उपयोग. इतकी ज्यांची तयारी असेल त्यांनीच यावे. त्यांना आम्ही काम देऊ शकू. काम भरपूर आहे."

बिहारचे हवामान विचित्र आहे. विशेषत: पुण्याच्या लोकांना ते कितपत मानवेल याबद्दलची शंका बिहारमध्येच असलेल्या एका जुन्या महाराष्ट्रीय कार्यकर्त्याने व्यक्त केली. उन्हाळ्यात इथे जोराचे गरमधुळीचे वारे वाहू लागतात. त्यांना लूं म्हणतात. सध्या रात्री थंडी असते आणि दिवसा भयंकर तापते. लूं वाहायला सुरुवात होऊ लागली आहे.

वैद्यकीय अभ्यासक्रमाची अखेरीची परीक्षा दिलेले दहा विद्यार्थी आले तर त्यांना आम्ही काम देऊ शकू, असेही श्री. जयप्रकाश यांनी सांगितले. विहिरी खोदण्यासाठी वगैरे इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांची गरज लागेल. अशा वीस–पंचवीस विद्यार्थ्यांना काम मिळू शकेल. पण या सर्वांनी कमीत कमी तीन महिने तरी इकडे राहायला हवे. तर त्यांच्या कामाचे चीज !

संघाच्या अकालपीडित सहायता समितीचे एक कार्यकर्ते म्हणाले, "आमच्याजवळ कार्यकर्ते भरपूर आहेत. धान्याची वगैरे मदत सर्वच ठिकाणांहून जाते. आम्हांला खरी गरज आहे ती शेतकीच्या उपकरणांची. नांगर, पंपिंग सेट, बोअरिंग-मशीन अशा वस्तू आम्हांला हव्या आहेत किंवा त्यांसाठी पैसे हवे आहेत, दुष्काळावर कायमचा तोडगा म्हणून दुष्काळग्रस्तांना तात्पुरते धान्य देण्याबरोबरच याही गोष्टी देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

पटन्यात बसून मिळणारी दुष्काळाची आणि निवारण कार्याची माहिती ही एवढी. दुष्काळाचा खरा भयानक तडाखा बसला आहे पलामू, गया, सरराण आणि मुंगेर या भागांना. आता तिकडे जायचे. ●

## ☐ दुष्काळ ?– छे, अवर्षण !

दुष्काळ हा शब्द हिंदुस्थानातील सरकारी गोटात क्वचितच वापरला जातो. युद्धकाळात बंगालवर भयंकर आपत्ती ओढवली होती तिलाच दुष्काळ म्हणण्यात येते; कारण तिची जबाबदारी ब्रिटिश राज्यकर्त्यांवर एकदा येते. पण हल्लीची फॅशन दुष्काळाबद्दल बोलण्याची नाही तर 'अवर्षणा'बद्दल बोलण्याची आहे. कारण, अवर्षण हा शब्द वापरला म्हणजे भूक ही मानवी बुद्धिमत्तेच्या बळावर निवारता येईल, असे संकट नसून दैवाचा कोप आहे असा आभास निर्माण करता येतो. —एक ब्रिटिश पार्लमेंट-सदस्य

# छाया

एकच गिरकी कशासाठी
बत्तीच्या प्रकाशात चमकते
नथ नाकातली खोटी
नाक तर नाही ना खोटे
खरी तू, खोटी तुझी गिरकी
दौलतजाद्यांच्या खिशावर नजर तुझी भिरकी

तशी तू ओंगळ
कोपऱ्यातली जळकी विडी
चाळ पायी वाजतात
ठेवून मनी फुसकी अढी
तुझा शृंगार लटका,
तुझे दिलदार लाख
फायांतून उडाला, सुगंध पक्षी
त्याचा दावतेस दिमाख
कसा का असेना अजून तोरा मोठा छान
कांति भासते नव्हाळीची, केतकीचे पान

किती उभारल्यास रात्री
सजवलीस सोंगे नाना
तुझ्या ठसक्याच्या इष्कबाजीवर
होतो पालथा खजिना

वाटते तितकी
नाहीस तू ओढाळ
सकाळचा आरसा सांगतो
हिचे फुटले रे कपाळ
तरी सांग कोणासाठी
जमवितेस सारी माया
उद्या काष्ठावर पेटणार
तुझ्या पापांचीहि छाया



– गोपाळ रेडगावकर

डोहाळे :

ऊस मळ्याच्या उशाला न्हाते डोहात अप्सरा
बांधावरच्या वेलींच्या गेल्या झिंगून नजरा
ऊस मळ्याच्या दांडाचं पाणी पपैया चाखतो
रानबाईच्या डोळ्यात ढग काजळ घालतो
ऊसमळ्याच्या पायाशी पानवेलींची फुगडी
रानबाईच्या कानात आंबामोहर बुगडी
ऊसमळ्याच्या कुशीत वारा हेरतो सावज
रानबाईच्या गळ्यात नऊ लाखांचा ऐवज
ऊसमळ्याच्या शेताची माती साखरी पुरण
कुण्या राजाची रानाई खाते चोरून लपून !

*— राजा महाजन*

# आ स्वा द

राजा महाजन यांचे ' डोहाळे ' या कवितेंतील चित्रण धवधवीत आहे. ग्रामीण जीवनाची शक्ती, आणि लावण्य दोन्ही त्यात दिसते. प्रत्येक दुसऱ्या ओळीला "ऊस मळ्याच्या" वातावरणाचा उल्लेख आल्याने रसिकाची दृष्टी एकाच देखाव्यावर एकाग्र होते. डोहात नहाणारी अप्सरा, निरनिराळी लेणी घेऊन पुन: पुन्हा मुखचंद्र दाखवणारी रानबाई, सावज हेरणारा वारा, फुगडी आणि बुगडी यांचा मेळ, सारेच काही गर्भवतीच्या गूढ आनंदाला उद्गार देणारे, तसेच रिझवणारेही आहे. एक धुंद आणि मस्त वातावरण रंगल्यानंतर हळूच शेवटच्या दोन ओळींत रानाई डोकावते. शेताच्या मातीला दिलेली साखरी पुरणाची उपमा तर फारच बहारदार आहे. प्रसंग नित्याचाच, पण एका वेगळ्या सृष्टीचे कोंदण देऊन राजा महाजन यांनी त्याला विलक्षण उठाव आणला आहे. पाण्यामध्ये अप्सरा (आसरा) असतात, याही लोक-संकेताचा सुंदर उपयोग करून घेतला आहे.

' छाया ' कवितेत एका कंचनीचे चित्र गोपाळ रेडगावकर यांनी रंगविले आहे. कंचनीचे जीवन खोटे असते. पैशासाठी तिला इष्काचे चाळे करावे लागतात; पण हे केवळ कंचनीच्याच बाबतीत खरे आहे काय ? तिच्या कृत्रिम आणि बाजारी जीवनाचा अर्थ लावून आजच्या व्यवहारी जगाचे त्यात प्रतिबिंब पडते आहे, असे दाखविले असते तर कवितेचे आवाहन विशाल झाले असते. शेवटी त्या कंचनीला कवीने थोडेफार दोषमुक्त केले आहे. तशी ' तू ओढाळ नाहीस, ' हे सांगून कवीने तिला वरच्या पातळीवर नेले आहे. कविवर्य माधव ज्यूलियन यांची याच विषयावरील कविता सदर ' छाये 'शी तुलना करून पाहण्यासारखी आहे. रेडगावकरांनी भाषा आणि आशय यांचा सुसंवाद कुठेही सोडला नाही, हे उल्लेखनीय वाटते.

*— गोपीनाथ तळवलकर*

●

# गणपुले मास्तर

*ती घटना घडली नसती तर पुढे गफूर एक मवाली मनुष्य झाला असता. माझी पण पावलं त्याच्या संगतीनं वाकडी पडायला लागली होती तीही सरळ झाली नसती!*

य. सं. कार्णिक

गणपुले मास्तर आता हयात नाहीत म्हणजे नसावेत. ते वारले केव्हा हे मला माहीत नाही. चौतीस–पस्तीस वर्षांपूर्वी, म्हणजे मी शाळकरी विद्यार्थी असताना, मास्तर उतरणीला लागले होते. म्हणजे आजमितीस हयात असले तर मास्तरांचं वय शंभर ते एकशेदहाच्या दरम्यान असेल; पण ती शक्यता नाही. सध्या मास्तर स्वर्गात तरी असावेत किंवा पुर्नजन्म घेऊन कुठेतरी शाळा-कॉलेजांत शिकत असावेत.

आमच्या गल्लीत सुबोध विद्यालय नावाची शाळा होती. अजूनही आहे. त्याला आम्ही 'भटांची शाळा' म्हणत असू. खरं म्हटलं तर त्या वेळच्या सर्वच शाळा भटांनी चालविलेल्या असायच्या. घाटगे मास्तर, कांबळे गुरुजी वगैरे मंडळी अलीकडची. मी ज्या शाळेचा विद्यार्थी होतो ते गणेश विद्यालय स्वतः अनुस्वारविरहित असलं तरी कोकणातून फणसपोळी आणि अनुस्वार यांचं गाठोडं देशावर घेऊन आलेल्या चित्तपावनांनीच चालविलेलं

होतं. तरीही भटांची शाळा म्हटली म्हणजे सुबोध विद्यालयच; गणेश विद्यालय नव्हे, हे ठरून गेल्यासारखं झालं होतं. कोण्या एके काळी गुंडो नरहर भट नामक छडीधारक ह्या विद्यालयात छापाचे विद्यार्थी पाडत होता. आसमंतात त्याचा दरारा एवढा पसरला होता की मुले झोपत नसली की, आया 'भटमास्तर छडी घेऊन आला' अशी भीती घालत आणि घाबरून मुलं चट्‌शिरी झोपत असं म्हणतात. ह्यात अतिशयोक्ती असेल. घोडा आणि संताजी घोरपडे ह्या आख्यायिकेत तरी ती कोठे नाही? सांगायचा मुद्दा असा की, भटमास्तर समाजाला असंख्य व्ह. फा. आणि 'सुबोध विद्यालया'ला आपलं नाव बहाल करून स्वर्गवासी झाले आणि त्यांच्या सिंहासनावर गणपुले मास्तरांचा उदय झाला.



गणपुले मास्तर आमच्या दारावरून रोज सकाळी शाळेला जायचे, त्यांच्या बरोबर रानडे मास्तर असत. दोघांची जोडी अभेद्य होती. दोघेही डोकीला पांढरे रुमाल बांधत. धोतर, बंद गळ्याचा कोट आणि पायांत पुणेरी जोडे, असा दोघांचाही पोशाख असे. रानडे मास्तर अंगाने किरकोळ आणि उंच. गणपुले अगदी बुटके नि त्यात पाठीमध्ये वाकलेले. सर्कशीतला विदूषक साधारण ज्या उंचीचा असतो, तेवढ्या उंचीचे. त्या वेळी लॉरेल-हार्डीचे चित्रपट अतिशय लोकप्रिय झालेले होते. विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळीही लॉरेल–हार्डीचे समजण्याइतपत उच्च. साहजिक रानडे-गणपुले जोडीला 'गजानन विद्यालय'चे विद्यार्थी लॉरेल-हार्डी असे म्हणत

ही टवाळी करण्यात धन्यता मानणाऱ्यांपैकी मी एक होतो.

गणपुले मास्तरांना मी नक्की कोठे व केव्हा पहिल्यांदा पाहिले, हे आता आठवत नाही; पण मी त्यांची रस्त्यात काहीतरी टवाळी केली आणि मित्रांनी घरी चहाडी केल्यानंतर आईचा खरपूस मार खाल्ला इथपासून इतिहास आठवतो. त्या पूर्वीची बखर संग्रही नाही.

मी एकदा घराच्या दारात उभा होतो. मास्तरद्वय शाळेत निघाले होते. मास्तरांच माझ्यावर लक्ष असावं. आमच्या दारासमोर येताच ते थबकले आणि माझ्याकडे रोखून पाहत त्यांनी प्रश्न केला—

" वंय कांय रें तुझें ?"

मी हादरलो. हा काय प्रकार आहे ? नावापूर्वी वयाची चौकशी का ? काहीतरी काळेबेरे असावे, असा संशय आला; पण करतो काय ? आईनं ओढलेल्या छडीचे वळ अजून ताजे होते. चट्‌शिरी वय सांगून मोकळा झालो.

संथपणे रानडे मास्तरांकडे वळून ते म्हणाले,

" वंयाचें मानांने लहान दिसतों नाहीं, मास्तर ? "

" हों तर, " रानड्यांनी मान हलवली.

" नांव काय तुझें ?"

मी नाव सांगितले.

" ह्या घरांत रांहांतोस ? "

" हो. "

" पगडी घालतात तें तुझें वडील कांय ?"

" नाही आजोबा. "

रानड्यांकडे पुन्हा वळून मास्तर म्हणाले,

" अगदीं लोकमान्यांसांरखें दिसतांत नाहीं, मास्तर ?"

" हों तर ! " रानड्यांनी मान हलवली.

" कोंठल्या शांळेंत जातोंस ? "

" गणेश विद्यालय. " मी ऐटीत सांगितलं.

" तंरींच ! लिमये मास्तर आहें हुशार, पण विद्यार्थ्यांवर वंचकं नांहीं हों. कसें मास्तर ? "

" हों तर ! " रानड्यांनी पुन्हा मान डोलावली.

त्यानंतर दोघेही निघून गेले.

सुबोध विद्यालयाला दुकानांना असतात तशा उभ्या फळ्या लावलेल्या होत्या. त्यामुळे फसून एकदा एक कुळंबीण तेथे दिडकीचं तेल मागायला गेली होती म्हणतात. शाळा बरोबर आठाला सुरू होई. आमचं गणेश विद्यालय इंग्रजी शाळांप्रमाणे अकरा वाजता भरे, आठपासून अकरापर्यंत सुबोध विद्यालयातील खड्या आवाजांत म्हटले

जाणारे परवचा, कविता नि घडे माझ्या कानांवर पडत. माझ्या वर्गात बसून जे पाढे मी शिकू शकलो नाही ते घराच्या पायरीवर बसून सुबोध विद्यालयाच्या फळ्यांमागून बाहेर पडणाऱ्या आवाजाने मी शिकलो. त्या दृष्टीने पाहिलं तर मी अप्रत्यक्षरीत्या गुणपुले मास्तरांचा विद्यार्थीच होतो.

पण मला गणेश विद्यालयाचा भलताच अभिमान! वास्तविक गल्लीतली शाळा सोडून मी दुसऱ्या शाळेत का गेलो हे समजत नाही. लिमये मास्तरांनी शाळेचे काही प्रॉस्पेक्टस काढले होते. त्याचा प्रभाव आमच्या तीर्थरूपांवर पडला असावा. पुन्हा सुबोध विद्यालयात व्ह. फा. तयार होत. गणेश विद्यालयाच्या पंचवार्षिक योजनेत 'म्याट्रिक'चा वर्ग उघडण्याची तरतूद होती. पुढे तो प्रत्यक्षात पहिल्या की चौथ्या योजनेत उघडला गेला हे आठवत नाही. मराठी चौथीची परीक्षा ही त्या वेळी बोर्डाची परीक्षा असे. सर्व शाळांतून परीक्षेला विद्यार्थी पाठवले जात आणि नेमका गणपुले मास्तरांचा विद्यार्थी पहिल्या नंबराला येई. ही परंपरा मोडण्याचा प्रयत्न जिद्दीनं मी करून पाहिला. माझा सतरावा नंबर आला. पहिले सोळा सर्वच्या सर्व गणपुले मास्तरांचे विद्यार्थी निघाले. तेवढेच सुबोध विद्यालयात चौथीच्या वर्गात शिकत होते. नाहीतर माझा नंबर आणखी खाली गेला असता यात काहीही शंका वाटत नाही. गणपुले मास्तरांचा बोर्डात काही वशिला असावा, असा संशय मला त्यानंतर कित्येक दिवस वाटत होता.

मास्तरांची छडी टेबलाने जेवढी खाल्ली तेवढी विद्यार्थ्यांनी खाल्ली नाही, असे म्हणतात. वास्तविक तो काळ म्हणजे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय भयंकर! आढ्याला उलटे टांगून खालून मिरच्यांची धुरी देणारे शिक्षक त्या काळी होऊन गेले. त्यांपैकी एकतरी शिक्षक आज हयात असता तर विद्यार्थ्यांचे दंगे होते ना. मी स्वतः लिमये मास्तरांच्या छड्या किती खाल्ल्या त्याला गणतीच नाही. 'हात पुढे कर' अशी गर्जना झाली की पायांतली शक्तीच निघून जाई. कारण हात पुढे करायला सांगून ते झट्कन् पायाच्या नळीवर छडी लगावीत. छड्या खाण्यात पार्श्वभागही सुटला नाही. पण तक्रार करायची सोय नव्हती. तक्रार करणार कुणाकडे? घरी म्हणायचे, "काहीतरी चावटपणा केला असशील; मास्तर कशाला उगीच मारतील?" पालकांचा मास्तरांवर नितांत विश्वास असायचा, की पालकसुद्धा मास्तर लोकांच्या छड्यांना घाबरायचे ते समजत नाही. संस्थानच्या दिवाणाचा एक मुलगा आमच्या वर्गात होता. त्याला एकदा मास्तरांनी छडीचा प्रसाद दिला. आम्हांला वाटले, लिमये मास्तरांची कारकीर्द संपली. चौकीची हवा खात पडावे लागणार. पण काही झाले नाही. चार दिवसांनी त्या पोराने पुन्हा मास्तरांचा मार खाल्ला. मग आमची खात्री झाली की शाळेच्या आवारात दिवाणाची हुकमत चालत नाही. असा तो काळ होता. ते असो.

गणपुले मास्तर मारत नाहीत; राग आला तर टेबलावर छडीचा आवाज काढ-

तात, असा एकदा गवगवा झाल्यानंतर आमच्या शाळेतली बरीच ओवाळून टाकलेली रत्ने सुबोध विद्यालयात गेली. माझे परममित्र जनाब गफूरमियाँ हे त्यांपैकी एक होत. त्या वेळी त्यांना इतक्या आदराने बोलावले जात नसे. लिमये मास्तर त्यांचा, त्यांच्या वालिद साहेबाचा आणि धर्माचा जो उद्धार करीत तो कानांनी ऐकवत नसे. कंटाळून गफूर शेवटी गणपुल्यांच्या शाळेत गेला तेथे त्याने उनाडपणाचा कहर केला, असे म्हणतात. रानडे मास्तरांचे धोतर ओढायलाही त्याने कमी केले नाही. पण शेवटी व्हा. फा. मध्ये गफूर बोर्डात सातवा आला. आज तो एक माननीय सद्‌गृहस्थ आहे.

सुबोध विद्यालयाच्या काही असंतुष्ट विद्यार्थ्यांनी गणपुले मास्तरांना दुपारच्या वेळी शाळेत कोणी नसताना बडवून काढण्याचा कट केला होता. त्या कटात गणेश विद्यालयाचे काही विद्यार्थी सामील होते. असल्या उचापती करण्याचा माझा जन्मजात स्वभाव. त्यामुळे मीही कटात होतो हे वेगळे सांगायचे कारण नाही. ह्या कटाचा सूत्रधार गफूर.

ती गोष्ट अशी झाली : गफूरने एका पोरीची छेड काढली. पोरगी तरी केवढी ? दहा–अकरा वर्षांची. त्या काळच्या दृष्टीने पाहिले तर तरुणीच होती ती ! गणपुले मास्तरांच्या कनांवर ही हकीकत जाताच ते भडकले. त्यांना ह्या एका गोष्टीचा फार राग होता. त्यांनी गफूरला हाक मारली,

" गफूंर्‍या इंकडें यें. "

गफूर थरथर कापत पुढे आला.

" म्लेंच्छां मुलींची चेंष्टां करतोस ? शरम कशीं रें वांटत नांहीं तुंला ? "

" पण मास्तर ती लडकी आपल्या शाळेतली नाही. "

" शांळेंतील असो, नांहींतर घरांतली अंसो. मुलगी नां रें ती ? तुला बहींण नांहीं कांय ? "

" हे बघा मास्तर. मी काही केलं असलं तर ते शाळेच्या बाहेर. तुमचा काय हक्क मला बोलायचा ? "

" दुष्टां मला कांयदां शिकवतोंस ? "

असं म्हणत मास्तरांनी गफूरच्या हातापायांवर, तोंडावर, पाठीवर सपासप छडया मारायला सुरुवात केली. गफूरनं हूं का चूं केलं नाही. पक्का निगरगट्ट तो. बाजूची काही मुलं घाबरून रडू लागली, पण गफूरच्या डोळ्यांतून टिपूस आलं नाही. छडी थकली. मास्तर थांबले. तेव्हा गफूर वर्गातून निघून गेला.

गफूर, मी आणि दोन्हीही शाळांतले आमचे काही उडाणटप्पू दोस्त पेठकरांच्या बोळात जमलो. तातडीची बैठक झाली. गणपुले मास्तरांच्या अक्षम्य अपराधाबद्दल त्यांना शिक्षा झालीच पाहिजे, ह्यावर सर्वांचे एकमत झाले. ज्या छडीनं मास्तरांनी गफूरला मारलं त्याच छडीचा प्रसाद मास्तरना द्यायचा असं ठरवलं. दुपारच्या

सुटीत मास्तर लोक एकटेच असतात. त्या वेळी सर्वांनी शाळेवरं धाड घालायची असा बेत झाला. आम्ही कोणी त्या दिवशी शाळेला गेलो नाही.

दुपारी बारा वाजता घणघण घंटा झाली. थकलेली मुले पाखरासारखी भुर्कन घरी पळाली. मास्तरलोकांनी डबे उघडले. जेवण करून मास्तर वर्गातच थोडा वेळ लवंडायचे. गफूरनं पुढं जायचं आणि मास्तर एकटेच आहेत याची खात्री करून घ्यायची. नंतर आम्ही घुसायचं असा बेत होता. त्याप्रमाणं गफूर शाळेत शिरला. आम्ही बोळात दबा धरून बसलो.

दहा मिनिटं झाली. पंधरा झाली. गफूर काही बाहेर येईना. आम्ही गोंधळलो. गफूरला मास्तरांनी बांधून तर ठेवला नाही? आमच्यातलं एक पोरगं हळूच जाऊन फटीतून बघून आलं. त्यानं सांगितलेला प्रकार विस्मयजनक होता.

गफूर बाकावर झोपला होता. मास्तर त्याच्या हातापायांना तेल चोळीत होते. आणि तो मुसमुसत रडत होता.

ही घटना घडली नसती तर पुढे गफूर एक मवाली मनुष्य झाला असता याबद्दल मला मुळीच शंका वाटत नाही. त्याच्या आयुष्यात त्या दिवसापासून आश्चर्यकारक बदल झाला. गणपुले मास्तरांचा तर तो पुढे पट्टशिष्य झाला. गफूरच्या संगतीने आणि त्याला खूष करण्याच्या हेतूने माझीही पावलं वाकडी पडायला लागली होती. ती ह्या प्रसंगामुळे सरळ झाली. गणपुले मास्तरांवर त्या वेळी मी हात टाकला असता तर तो कलंक मला आयुष्यभर घेऊन फिरावं लागलं असतं याची जाणीव होऊन अजूनही हुरहूर वाटते.

मी पुढे गणेश विद्यालय सोडलं, हायस्कुलात गेलो, शिक्षणासाठी मुंबई गाठली, जीवनप्रवाहात वाहत गेलो, अनेक बऱ्यावाईट स्मृती मनाच्या झोळीत साठवल्या. पण गणपुले मास्तरांना विसरलो नाही. त्यांच्या हाताखाली शिक्षण घेतलं नसतानाही त्यांचीच आठवण का यावी ? अनेक मास्तरांच्या छड्या या शरीरानं झेलल्या पण गणपुल्यांच्या न खालेल्या छडीचीच याद का व्हावी ?

याला माझ्याजवळ उत्तर नाही. गणपुले मास्तरांना आदर्श शिक्षक म्हणून कोणी पारितोषिक दिलं नाही. ते एस्. टी. सी. नव्हते, बी. एड्. नव्हते, बी. ए, बी. टी. नव्हते आणि एम्. ए. बी. टी., टी. डी. (लंडन) तर नव्हतेच. त्यांचं क्वालिफिकेशन एकच. चारित्र्य. विद्यादानाचं व्रत घेतलेल्या शिक्षकांचे गणपुले मास्तर हे मेरूमणी होते. त्यांचे अनेक विद्यार्थी आज मोठ्या पदांवर आरूढ झालेले आहेत. जे वर चढू शकले नाहीत ते निदान चांगले नागरिक तरी झालेले आहेत. मी जीवनात अपयशी ठरलो याचं कारण गणपुले मास्तरांचा विद्यार्थी नव्हतो, अशी माझ्या मनाची समजूत झालेली आहे. त्यात तथ्य असेल वा नसेल.

गणपुले मास्तर अविवाहित होते. त्यांच्या उंचीला साजेशी मुलगी चित्पावनात मिळाली नसावी. रानडे मास्तरांच्या विधवा बहिणीवर त्यांचं प्रेम होतं अशी एक

अफवा त्या वेळी टवाळखोरांनी उठवली होती. ती खोटी होती यात संशय नाही. खरी असेल तर ते प्रेम सफल होऊ न देणारा काळ गुन्हेगार होता असंच म्हणावं लागेल. मास्तर गोरेपान व देखणे होते. ब्रह्मचर्याचं तेज त्यांच्या तोंडावर विलसत असे. त्यांना कसलीही व्यसनं नव्हती. धूम्रपान तर सोडाच पण कधी त्यांना सुपारी चघळतानाही मी पाहिलं नाही.

मास्तरांचा आवाज खडा होता. ते वर्गात कविता शिकवीत तेव्हा त्यांचा आवाज आमच्या स्वयंपाकघरापर्यंत येई. आई भाकऱ्या थापताना हात थांबवून ऐकत राही.

"भो पंचम जॉर्ज भूप धन्य धन्य विबुधमान्य सार्वभौम भूतला..."

अशा ओळी माझ्या कानांत घुमत असतात.

'छडी लागे छम् छम्, विद्या येई घमघम' ही आमच्या आजोबांची आवडती म्हण काळाच्या उदरात लुप्त झाली आहे. छडी आणि विद्येचा त्या वेळी फार घनिष्ट संबंध होता. बदलत्या काळात 'मुलांचे मानसशास्त्र' वगैरे प्रकार आले. त्यांच्याशी आपल्याला काही कर्तव्य नाही.

सुबोध विद्यालयाला दुकानासारख्या उभ्या फळ्या होत्या. पण ते विद्येचं मंदीरच राहिलं, दुकान झालं नाही. निदान गणपुले मास्तर असेपर्यंत तरी.


# घाटगे आणि पाटील

राजाराम रोड धारवाड रोड वखार भाग कोप्पीकर रोड

कोल्हापूर बेळगाव सांगली हुबळी

अॅम्बेसडर कार्स । बेडफोर्ड ट्रक्स । जीप्स । मॅसी-फर्ग्युसन ट्रॅक्टर्स ।

लॅम्ब्रेटा – स्कूटर्स – रिक्षा । पर्किन्स डिझेल इंजिन्स ।

रॅले – रज – हंबर – रॉबिनहूड – हरक्युलस – बायसिकल्स,

ऑल्विन प्रेस्टकोल्ड रेफ्रिजरेटर्स । स्लॉटेड अँगल्स ।

जेन्युइन – स्पेअर – पार्टस व निर्दोष – रिपेअर्स

घाटगे आणि पाटील

टिळक रोड, पुणे ९



# आणि ड्रॅगन जागा झाला

अरुण साधू

उत्तरार्ध
लेखांक
अकरावा

दुसरे महायुद्ध संपले तेव्हा सर्वत्र चीनमध्ये जपानी आघाड्यांच्या पिछाडीस चिनी कम्युनिस्ट आपले पाय घट्ट रोवून बसले होते. कोमिन्टांगच्या प्रचारामुळे कम्युनिस्टांच्या ताकदीची बाहेरच्या जगात कुणालाच कल्पना नव्हती. बाहेर कुणालाही नकळत त्यांनी अनेक लढाया जिंकल्या होत्या, जपान्यांच्या ताब्यात गेलेल्या रेलमार्गांवर छापे घालून त्यांचे दळणवळण बंद पाडले होते, खाणींवर हल्ले चढविले होते आणि अनेक ठिकाणी त्यांची रसद तोडली होती. १९४१ मध्ये कोमिन्टांग तुकड्यांनी लाल सैन्यावर हल्ले केल्याने त्यांना कोमिन्टांगविरुद्धची आपली फळीही मजबूत ठेवावी लागत होती, पण त्यांनी जपान्यांचा प्रतिकार सोडला नाही. शेतांमधून, डोंगरांमधून, खेड्यांमधून, भुयारांमधून कम्युनिस्ट आणि त्यांचे गनिमी सैनिक जपान्यांचे लचके तोडून त्यांना खच्ची करीत होते. जपानचा चीनमधील खरा शत्रू म्हणजे लाल सैन्य, असे शेवटी शेवटी टोकिओ रेडिओवरूनही पुनः पुन्हा सांगण्यात येऊ लागले. ते खरेच होते; कारण, जपान्यांनीच कोमिन्टांगला मागे रेटत दक्षिणेकडे पिटाळले होते. आणि चँग-कै-शेक आता नुसता युद्ध संपण्याची वाट पाहत होता. जपान्यांवर प्रतिहल्ला करण्याची त्याच्यात ताकद उरली नव्हती.

त्यामुळे युद्ध संपले तेव्हा माओ-त्से-तुंग आणि मार्शल चुह-तेह यांनी तावडतोब ज्या ज्या ठिकाणी लाल सैन्य जाऊन थडकले होते आणि गनिमी कम्युनिस्ट काम करीत होते त्या त्या ठिकाणी

सोव्हिएट सरकारचीच सत्ता स्थापिली जावी, असा प्रयत्न चालविला.

ज्या दिवशी अमेरिकेने नागासाकीवर अणुबाँब टाकला त्याच दिवशी रशियाने जपानविरुद्ध युद्ध पुकारलें, आठवडाभरात जपानने युद्ध-शरणागती घोषित केली; पण रशियन सैन्याने या घोषणेकडे दुर्लक्ष केले आणि भराभर मांच्युरियामधील जपानी सैन्यावर हल्ले चढवीत संपूर्ण मांच्युरिया ताब्यात घेण्यास सुरुवात केली. रशियन सैन्याचा पहिला रोख मांच्युरियातील सर्व शहरे, मोठे उद्योगधंदे आणि रेलमार्ग यांच्यावर होता. रशियन सैन्याबरोबरच आतापर्यंत मॉस्कोमध्ये असलेल्या चिनी कम्युनिस्टांची एक चमूही मांच्युरियात उतरली. चिनी कम्युनिस्ट पक्षात माओचा प्रतिस्पर्धी असलेला ली-ली सान हा या चमूचा नेता होता. पूर्व युरोपात दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनांची शरणागती पत्करण्यासाठी जिथे जिथे रशियन सेना घुसल्या होत्या तिथे तिथे पोलंड, हंगेरी, रुमानिया, झेकोस्लोव्हाकिया, पूर्व जर्मनी आदी देशांमध्ये, त्या त्या देशांचे मॉस्कोमध्ये असलेले आपल्या विश्वासातील कम्युनिस्ट नेते स्टॅलिनने आपल्या सैन्याबरोबर पाठविले होते आणि त्यांच्या हस्ते आपल्याला हवी तशी आपल्या तालावर नाचणारी कम्युनिस्ट सरकारे स्थापन केली होती. चीनमध्येही त्याला हेच करायचे होते. म्हणून त्याने ली-ली सान आदी चिनी कम्युनिस्टांना मांच्युरियात पाठविले होते.

इकडे जपानने शरणागती पत्करल्यावर दोस्त सैन्याचा सरसेनापती जनरल मॅक् आर्थर याने जपानी सेनांनी मांच्युरियात रशियनांच्या आणि इतर प्रांतांत चँग-कै-शेकच्या सैन्याच्या स्वाधीन व्हावे, अशा सूचना जपानी सैन्याला दिल्या. या दोन सैन्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही सैन्याच्या स्वाधीन होण्यास त्याने मनाई केली.

## चँगची माओला तार

माओ आणि चुह भडकले. जपान्यांच्या प्रतिकारात रक्त सांडले ते लाल सैन्याने आणि आता विजयाची फळे मात्र चँग खाणार. दुसरे दिवशी मार्शल चुह-तेहनेही एक आज्ञा काढून लाल सैन्य जिथे जिथे जपान्यांना धरून उभे होते तिथे तिथे जपान्यांची शरणागती पत्करण्याच्या सूचना त्याने लाल सैन्याला पाठविल्या. आपली ही आज्ञा त्याने त्या वेळची चँगची राजधानी चुंगकिंग येथील ब्रिटिश, अमेरिकन आणि रशियन राजदूतांनादेखील कळविली, परंतु रशियासकट दोस्त राष्ट्रांनी चिनी कम्युनिस्टांची ही सूचना धुडकावून लावली. जपान्यांची शरणागती पत्करण्याचा अधिकार चीनमध्ये फक्त चँग-कै-शेकलाच आहे असे त्यांनी लाल सैन्याला कळविले आणि चँगला 'चायना झोन'चा कमांडर नेमून टाकले. त्यामुळे चीनमध्ये असलेल्या सर्व अमेरिकन सेना चँगच्या हुकमाखाली आल्या. प्रचंड प्रमाणावर अमेरिकन शस्त्रास्त्रांची मदत चँगकडे येऊन पडू लागली, माओने आणि चुहने ही मदत फक्त चँगलाच मिळते आहे याबद्दल अमेरिकेला कडक निषेधाचे खलिते पाठविले.

ही शस्त्रास्त्रे चँग कम्युनिस्टांविरुद्ध वापरील म्हणून ती त्याला देऊ नयेत, अशी माओने विनंती केली. अमेरिकेने शहाणपणा करून ही विनंती ऐकावयास हवी होती; कारण, चँगने पुढे ही सारी मदत खरोखरच कम्युनिस्टांच्या विरुद्ध वापरण्याचा प्रयत्न केला. आणि त्याचा परिणाम असा झाला की ती सगळी शस्त्रास्त्रे–बंदुका, तोफा, विमाने, दारूगोळा–सारी सारी पुढे कम्युनिस्टांच्या हाती आली.

संबंध अधिकाअधिक फाटू लागले. वातावरणातील तंगपणा वाढू लागला. आता नागरी युद्ध अटळ आहे, असे सर्वांना वाटू लागले. अमेरिकेचे पाठबळ मिळाल्याने पुन्हा कम्युनिस्टांना नेस्तनाबूद करण्याच्या ङरकाळचा चँग-कै-शेक फोडू लागला होता. परंतु आता 'वाट्टेल ते करण्याचे' अधिकार त्याच्याकडे नव्हते. अगोदरच नागरी युद्ध थोपवून कोमिन्टांगने आणि कम्युनिस्टांनी आपसांतले मतभेद बोलणी करून सोडवावेत अशी जोरदार मागणी चीनमध्ये होत होती. आणि अमेरिकनांचा मागणीला पाठिंबा होता. त्यामुळे चँगने निर्मूलनाची आपली मोहीम बाजूला ठेवून माओला "बोलणी करण्यासाठी चुंगकिंगला येण्याची नम्र विनंती" करणारी तार येनानला पाठविली. माओनेही उलट तार पाठविली, "शांतता आणि चीनची पुनर्रचना यांविषयी बोलणी करण्याची या पामराला अतीव इच्छा आहे." माओने तारेवर सही केली, "आपला धाकटा भाऊ."

ऑगस्ट १९४५ रोजी माओ-त्से-तुंग आयुष्यात प्रथमच विमानात बसला. चँगची भेट घेण्यासाठी तो येनानहून अमेरिकन विमानाने चाऊ-एन-लायसह चुंगकिंगला जाण्यासाठी निघाला. गेली वीस वर्षे चँगने आणि इतर जगाने माओला आणि लाल सैन्याला तुसडेपणाने वागविले होते. चँगने कम्युनिस्टांशी बोलणी करण्याची तयारी कधीच दाखविली नव्हती. उलट उठल्यासुटल्या कम्युनिस्टांना चेचून काढण्याच्या घोषणा तो करीत होता. आज मात्र एका बलाढ्य सैन्याचा आणि राज्याचा प्रतिनिधी म्हणून माओ त्याच्याशी बोलणी करण्यास जात होता. चीनच्या इतिहासात ही बोलणी महत्त्वाची ठरणार होती. नागरी युद्ध की तह हा प्रश्न या बोलण्यांमध्ये धसाला लागणार होता. तह झाला तर साऱ्या चीनचे राजकीय चित्र बदलणार होते. आणि नागरी युद्ध झाले तर ते अखेरचे नागरी युद्ध ठरणार होते. त्यात कुणा एकाचा निःपात होणार होता. माओचा तरी किंवा चँगचा तरी. कारण लाल सैन्य गेल्या कैक वर्षांच्या भीषण युद्धाच्या अनुभवानंतर अतिशय तयार आणि प्रबळ झाले होते, तर कोमिन्टांग सैन्याला अमेरिकन शस्त्रबळाचा पाठिंबा होता.

## कवी माओ

या प्रसंगाचे ऐतिहासिक महत्त्व माओ जाणून होता. आयुष्यात प्रथमच विमानात तो बसला असल्याने इतक्या उंचावरून आपल्या मायभूमीचे दर्शन तो प्रथमच घेत होता. बर्फाच्छादित शिखरे, हिरवी शेते, नद्या भराभर खालून सरकत होती. आणि

माओच्या मन:पटलासमोरून चीनचा सारा इतिहास सरकत होता. इतिहासात कधी घडली नाही अशी गोष्ट आता घडणार आहे, साऱ्या चीनचे चित्र आता पालटणार आहे हे त्याला जाणवत होते. अशा मन:स्थितीतच त्याने विमानात एक कविता लिहून काढली. 'स्नो'–'हिम' या नावानें ही कविता प्रसिद्ध आहे. कुंच-ल्याच्या दोन-चार फटक्यांत एखाद्या चित्रकाराने अतिशय आश्चर्यकारक रीतीने एखादी सुंदर आकृती काढावी, त्याप्रमाणे त्याने अवघ्या काही ओळींमध्ये शुभ्र हिमात बुडालेल्या चिनी भूमीचे काव्यमय दर्शन घडवीत चीनच्या साऱ्या इति-हासाला विळखा घालून शेवटच्या ओळींमध्ये लिहिले–

"ही भूमी, या नद्या आणि त्यांचे वेडे सौंदर्य
चिनी सम्राटांना, विजेत्यांना त्यांनी स्फूर्ति दिली
चिन, हान, तांग, संग यांनी दिग्विजय केले
पण अरेरे ! ते सारे खुजे होते
अगदी चंगीजखान सुद्धा
शिकार क्रीडा हीच त्यांची मौज होती
पण आज इतिहासाच्या क्षितिजावर उंच माणसे उभी आहेत
आकाशाच्या उंचीशी स्पर्धा करणारी"

अतिशय अस्पष्ट, गूढ अशी ही चिनी भूमीला उद्देशून लिहिलेली प्रेमकविताही आहे आणि चीनमध्ये लवकरच घडणाऱ्या प्रचंड क्रांतीचे सूचक दर्शनही या काव्यात आहे. विजयाचा त्यात आत्मविश्वास आहे आणि वर्तमानकाळाच्या ऐतिहासिक माहात्म्याची त्यात गर्वपूर्ण जाणीवही आहे. माओ-त्से-तुंगने जुन्या पद्धतीने लिहि-लेली ही कविता आधुनिक चिनी काव्यातील एक उत्तम नमुना म्हणून समजली जाते.

एखाद्या सार्वभौम देशाच्या नेत्याच्या इतमामाने माओचे चुंगकिंगमध्ये स्वागत झाले. वीस वर्षे जंगलांमध्ये आणि गुहांमध्ये काढलेला हा लाल दरोडेखोर दिसतो तरी कसा हे पाहण्यासाठी चुंगकिंग विमानतळावर बरीच गर्दी जमली होती. आता-पर्यंत येनानला जाऊ न शकलेल्या परदेशी वृत्तपत्रांच्या वार्ताहरांनीही त्याला पाहण्यासाठी गर्दी केली.

## चँग-माओ प्रदीर्घ चर्चा

चँगशीही माओची लवकरच भेट झाली. चँगने त्याला एका मेजवानीलाच बोलाविले होते. ही बोलणी चाळीस दिवस चालली होती. या दिवसांमध्ये कोमि-न्टांग राजवटीत असलेल्या अनेक लेखकांना आणि बुद्धिवाद्यांना भेटण्याची माओला संधी मिळाली. चिनी इतिहासाचे सूक्ष्म ज्ञान, परंपरागत सुसंस्कृतपणा आणि कविता करण्याची त्याची हातोटी यामुळे माओने त्यांना चांगलेच प्रभावीत केले. आपल्या

सर्व भाषणांमध्ये चिनी कम्युनिस्टांना लोकशाहीवादी संयुक्त सरकार स्थापन करण्याची किती तळमळ आहे हे तो पटवून देत असे.

बोलणी लांबत होती. मतभेद प्रखर होते. पण उघड भांडण करून बोलणी फिसकटून टाकायचे माओने टाळले. लाल सैन्यावर आणि कम्युनिस्टांच्या ताब्याखाली असलेल्या भूप्रदेशावर कोमिन्टांगचा अधिकार येऊ देण्यास त्याचा सक्त विरोध होता.

अखेर ११ ऑक्टोबर १९४५ रोजी कम्युनिस्ट आणि कोमिन्टांगतर्फे कसेबसे एक संयुक्त पत्रक घोषित करण्यात आले. त्यामध्ये दोहोंमधील प्रमुख समस्या मिटविण्यासाठी एक सर्वपक्षीय सल्लागार समिती लवकरच स्थापन करण्यात येणार असल्याचे सांगितले गेले. घटनात्मक सरकार लवकरात लवकर स्थापन करण्यास दोन्ही पक्षांनी मान्यता दिली आणि देशाच्या प्रगतीसाठी शांतता, लोकशाही आणि एकता यांची कास धरण्याचे आवाहन करण्यात आले. सर्व राजकीय पक्षांना अधिकृत मान्यता देऊन राजबंद्यांना मुक्त करण्याचे चँग-कै-शेकने मान्य केले तर माओनेही लाल सेनेची संख्या चीनच्या एकूण सेनाबळाच्या एक-पंचमांशपर्यंत कमी करण्याचे कबूल केले.

संयुक्त पत्रक घोषित झाले खरे; पण त्यात दम नव्हता. आपणांमुळे बोलणी खुंटली हे कुणालाही दाखवायचे नव्हते. त्यामुळे कसेबसे हे पत्रक तयार झाले. मुख्य प्रश्नांना पत्रकात हातच घालण्यात आला नव्हता: आणि मुख्य म्हणजे सारे पत्रकच मोघम होते. लाल सेना कुणाच्या ताब्यात असाव्यात आणि कम्युनिस्टांनी जपान्यांची शरणागती पत्करावी किंवा नाही या बाबतीत काहीच निर्णय झाला नव्हता.

११ ऑक्टोबरला माओ येनानला परतला तेव्हा त्याला शांततेची फारच थोडी आशा उरली होती. चँगच्या मनात कम्युनिस्टांविषयी काही भले नाही असे त्याला सारखे वाटत होते.

दोन दिवसांतच बारीक सारीक चकमकींना आणि कुरापतींना सुरुवात झाली. प्रथम हल्ला शत्रूने केल्याचे आरोप-प्रत्यारोप परस्परांवर केले जाऊ लागले. आणि लवकरच लाल दरोडेखोरांच्या निर्मूलन मोहिमेची नवी योजना चँग-कै-शेकने जाहीर केली. ऑक्टोबरच्या शेवटाला चँगचे सुमारे सव्वा लाख सैनिक उत्तर चीनमधील लाल फळ्यांवर हल्लेही चढवू लागले. या कुरापती आता वाढत जाणार, अशी चिन्हे दिसू लागली.

दरम्यान जपानी शरणागती पत्करण्यासाठी चँगच्या आधिपत्याखाली आलेले अमेरिकन सैनिक उत्तर चीनमध्ये तियेनस्तीन आणि पेकिंग येथेही तळ ठोकू लागले होते. उत्तर चीनमधील सर्व शहरांभोवती लाल सैन्याचा गराडा होता. त्यामुळे अमेरिकन सैनिक कोमिन्टांगच्या बाजूने लढण्यासाठीच आलेले आहेत, अशी कम्युनिस्टांची समजूत होऊ लागली. आणि त्यामुळे अमेरिकेच्या मध्यस्थीच्या प्रयत्नां-

वरील कम्युनिस्टांचा विश्वास उडू लागला. कोटचवधी डॉलर्सची अमेरिकन मदत चँगच्या बाजूने येतच होती. आणि कम्युनिस्टांनी कितीही निषेध खलिते पाठविले तरी ती चालूच राहणार, असे घोषित करण्यात आले होते.

परिस्थिती गंभीर आहे, आणिबाणीची वेळ येते आहे, असे पाहून कम्युनिस्टांनी येनान येथून आपली राजधानी अधिक उत्तरेकडे हलविण्याचे ठरविले. डिसेंबर १९४५ मध्येच येनानमधील कचेऱ्या, कारखाने, शाळा-कॉलेजेस आणि रुग्णालये हलविण्यास सुरुवात झाली. सारे सामान पुन: गाढवांच्या, खेचरांच्या पाठीवर बांधून शेन्सी प्रांताच्या उत्तरेला जाऊ लागले. सोव्हिएट सरकार पुन्हा एकदा हलू लागले होते. माओ आणि चुह-तेह त्यानंतर बरेच दिवस येनानहूनच सूत्रे हलवीत होते, पण एक वर्षाच्या आत त्यांनाही येनान सोडावे लागले.

## अमेरिकेची मध्यस्थी

डिसेंबर १९४५ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष ट्रूमन यांनी जनरल मार्शल याला आपला प्रतिनिधी म्हणून चीनमध्ये पाठविले. जनरल मार्शल हा अतिशय उत्साही आणि तळमळीचा माणूस होता. त्याने मुद्दाम येनानला भेट दिली. कम्युनिस्टांच्या सामाजिक धोरणाची त्याने प्रशंसा केली आणि कोमिन्टांग अधिकाऱ्यांच्या मग्रूरपणा-बद्दल त्याने नापसंती दर्शविली. दोन्ही बाजूंकडचा विश्वास संपादन करून १९४६ च्या सुरुवातीला तात्पुरती युद्धबंदी करण्यात त्याने यश मिळविले. ही युद्धबंदी चालू असतानाही दोन्ही बाजू स्वस्थ बसल्या नव्हत्या. मोठमोठ्या शहरांमध्ये जपान्यांची शरणागती पत्करून आपला ताबा पक्का करण्याचे काम चँगने चालूच ठेवले होते. इकडे ग्रामीण विभागातले आपले तळ वाढविणे लाल सेनेनेही चालू ठेवले होते. रशियाशी झालेल्या करारानुसार चँगने मांच्युरियामधील गावे, बंदरे ताब्यात घेण्यास सुरुवात केली होती. हवाई मार्गाने आपल्या सैन्याच्या प्रचंड तुकडया पाठ-विणे त्याने सुरू केले आणि हे सैन्य कमी पडेल म्हणून की काय, त्याने 'शांतता रक्षक दल' स्थापन करण्याच्या नावाखाली मांच्युरियनांची सक्तीची लष्कर-भरती सुरू केली.

दरम्यान या शांततेच्या काळात अगोदर ठरल्याप्रमाणे जनरल मार्शलने आपल्या पुढाकाराने सर्वपक्षीय सल्लागार समितीची बैठक भरविण्यास उत्तेजन दिले होते. या समितीची ही पहिली आणि शेवटचीच बैठक ठरली. जनरल मार्शल हा खरो-खरच नि:पक्षपाती होता. या समितीमध्ये तो कम्युनिस्ट आणि कोमिन्टांग यांच्या भांडणात कुणाचेच न ऐकता मध्यममार्गी लोकशाहीवाद्यांना अधिक पाठिंबा देई.

परंतु कम्युनिस्ट काय किंवा लोकशाहीवादी वा मध्यममार्गी उदारमतवादी काय या सर्वांचाच चँग-कै-शेक तिरस्कार करीत होता. लवकरच चँगच्या गुप्त पोलिसांच्या कारवाया सुरू झाल्या. प्रथम त्यांची धाड चुंगकिंग येथील कम्युनिस्ट पक्षाच्या

वृत्तपत्रांच्या कचेरीवर पडली. लगेच छोटी छोटी कम्युनिस्टविरोधी निदर्शने संघटित केली जाऊ लागली आणि पुढे या निदर्शनांचा रोख लोकशाहीवादी आणि उदारमतवाद्यांवरही वळला. आणि सल्लागार समितीने कम्युनिस्ट निर्मूलनाच्या मोहिमेला पाठिंबा द्यावा असे कोमिन्टांग सभासद आग्रह धरू लागले तेव्हा समितीच कोसळून पडली आणि पुन्हा युद्ध-आघाड्यांवर चकमकींस प्रारंभ झाला. दोन्ही बाजूंच्या रेडिओंवरून एकमेकांवर पुनः पुन्हा आरोप-प्रत्यारोप करणे सुरू झाले.

## वादळापूर्वीची शांतता

या वेळी आरोप करण्यास कम्युनिस्टांना खरोखरच कारणे होती. अमेरिकन शस्त्रास्त्रांनी सुसज्ज झालेल्या सेना आता कम्युनिस्टांवर जोरात हल्ले चढवू लागल्या होत्या. अमेरिकन अधिकाऱ्यांचे कोमिन्टांग सैन्याला मोठ्या प्रमाणावर मार्गदर्शन मिळत होते. कम्युनिस्ट गोटातील चिंता वाढू लागली होती. कम्युनिस्ट राजधानी अगोदरच उत्तरेकडे हलविली जाऊ लागली होती. मोठ्या प्रमाणावरील नागरी युद्ध अटळ आहे, असे आता वाटू लागले होते. आपल्यावर हल्ला चढविण्यासाठी चँग-कै-शेक सुमारे दहा लाखांची सेना उत्तरेकडे पाठवीत आहे, असा आरोप कम्युनिस्ट करीत होते. आणि खरोखरच कोमिन्टांग सैन्य अमेरिकन विमानांमधून मोठ्या प्रमाणावर मांच्युरियात उतरविले जाऊ लागले होते. एवढे प्रचंड सैन्य कशासाठी ! शरण आलेल्या जपान्यांना निःशस्त्र करण्यासाठी एवढ्या सैन्याची गरज खासच नव्हती. वातावरण खूपच तंग झाले होते.

आणि एकाएकी जून १९४६ मध्ये पुन्हा वातावरणातील हा तंगपणा सैल झाला. बरीच धावपळ करून जनरल मार्शलने पुन्हा एक तात्पुरती युद्धबंदी घडवून आणली. सर्व चीनभर एकप्रकारची चमत्कारिक शांतता पसरली. परस्परांविषयीचा द्वेष तर उतू चालला होता, पण कम्युनिस्ट आणि कोमिन्टांग या दोघांनीही काही काळापुरत्या आपापल्या बंदुकीच्या नळ्या वर केल्या. स्तब्ध पृष्ठभागाखाली मात्र कसलीतरी प्रचंड खळबळ चालू होती. ही शांतता फार दिवस टिकणार नाही. काही तरी भयानक घडणार आहे; असे सारखे वाटत होते.

ही शांतता सुमारे महिनाभर टिकली. तडजोड करायची कुणाचीही तयारी नव्हती. आतापर्यंत रशिया आणि अमेरिका यांच्यांतील संबंध बिघडू लागले होते. त्यामुळे आपणांला अधिकच अमेरिकन मदत मिळेल, अशी आशा चँगला वाटू लागली होती. माओ आणि त्याच्या सहकाऱ्यांनाही आता आत्मविश्वास वाटू लागला होता; कारण इतकी वर्षे कम्युनिस्टांशी लढल्यानंतरही चँग अजून काहीच धडा शिकला नव्हता. अजूनही तो आपली सारी शक्ती शहरांमध्ये केंद्रित करण्याच प्रयत्न करीत होता. ही सारी शहरे सर्व बाजूंनी लाल सैन्याच्या ताब्यात असलेल्या मुक्त ग्रामीण विभागांनी वेढली गेली होती. ग्रामीण लोकवस्तीच्या प्रचंड महा-

सागरात चँगची शहरे बटांप्रमाणे होती. आजूबाजूच्या प्रदेशांत कोमिन्टांगला एवढा विरोध असायचा की बऱ्याचशा शहरांना धान्य आणि इतर वस्तूंचा पुरवठा फक्त विमानानेच करता येत असे. लाल सैनिक रेल्वेची वाहतूक ठिकठिकाणी रोखून धरीत असल्याने त्यांचाही कोमिन्टांगला काही उपयोग होत नव्हता.

## डेमोक्रॅटिक लीगचा वाढता जोर

या अस्वस्थ युद्धबंदीच्या काळात जनरल मार्शलने पुन्हा एकदा चीनमध्ये स्थिर आणि संयुक्त सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीने निकराचा प्रयत्न केला. जनरल मार्शलचा भर हा कम्युनिस्ट आणि कोमिन्टांगपेक्षा लोकशाहीवादी विचारसरणीच्या उदारमतवादी बुद्धिवाद्यांवर होता, हे मागे सांगितलेच आहे. या बुद्धिवाद्यांनी स्थापन केलेला 'डेमोक्रॅटिक लीग' हा पक्ष लोकप्रिय होत असल्याची चिन्हे दिसू लागली होती. चँगच्या भ्रष्टाचारामुळे आणि दडपशाहीमुळे बेजार झालेला आणि कम्युनिस्टांविरुद्ध पूर्वग्रह असलेला मध्यमवर्ग हा या लीगचा कणा होता. देशातील सर्व प्रथितयश बुद्धिवाद्यांचा, विद्यार्थ्यांचा आणि सुशिक्षित वर्गाचा या लीगला पाठिंबा होता. चीनमध्ये जर मुक्त निवडणुका घेतल्या तर ही लीग मोठ्या बहुसंख्येने निवडून येईल असे दिसत होते.

परंतु लीगची लोकप्रियता चँगच्या डोळ्यांवर येऊ लागली होती. आणि लोकशाहीवाद्यांच्या मागे साऱ्या देशाच्या सदिच्छा असल्या तरी त्यांच्या पाठीशी सैन्य नव्हते, सत्ता नव्हती. चँगच्या हाताशी सर्व काही होते.

सुरुवातीला चँगच्या गुप्त पोलिसांनी लीगच्या सामान्य कार्यकर्त्यांना अटक करण्यास सुरुवात केली. नंतर वेगवेगळ्या विद्यापीठांत लीगची पाठराखण करणाऱ्या प्राध्यापकांवर धाड आली. हळूहळू चँगने उघडपणे लीगवाद्यांना दडपण्याचे सत्र आरंभिले. धरपकड वाढू लागली. लीगच्या कचेऱ्यांवर गुप्त पोलिसांच्या धाडी पडू लागल्या आणि सांसदीय लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्यांना कॉन्सेंट्रेशन कँम्समध्ये शिक्षा भोगण्यासाठी पाठविले जाऊ लागले. एवढे उपाय पुरेसे नाहीत की काय, असे वाटून गुप्त पोलिसांनी खुनाचे सत्र आरंभले. लीगचे अनेक नेते रहस्यमय रीतीने मारले जाऊ लागले. लीगची चळवळ जवळ जवळ संपुष्टात आली. चँगच्या कोमिन्टांग सरकारला पर्यायी सरकार बनवू शकेल अशी कम्युनिस्टांव्यतिरिक्त एक लीगचीच चळवळ समर्थ होती; पण चँगने ही चळवळ अशा रीतीने गाडून टाकली. त्याचा परिणाम मात्र उरलेल्या बुद्धिवाद्यांवर झाला. चँगच्या राजवटीला आधीच कंटाळलेल्या चिनी समाजाला आता कम्युनिस्टांशिवाय आशेचा दुसरा किरणच दिसत नव्हता. डेमोक्रॅटिक लीगचे कितीतरी नेते त्यामुळे कोमिन्टांगच्या हातून निसटून कम्युनिस्टांना जाऊन मिळाले. लोकशाहीवादी सरकार बनविण्याची माओची घोषणा जुनीच होती. कोमिन्टांग राजवटीतील लोक-

शाहीवाद्यांची होत असलेली गळचेपी बघून माओने आपला प्रचार वाढवला आणि साऱ्या लोकशाहीवाद्यांना देशाच्या रक्षणासाठी, हितासाठी कम्युनिस्टांना येऊन मिळण्याचे आव्हान केले. चँगच्या भ्रष्टाचारी दडपशाहीपेक्षा कम्युनिस्टांची शिस्तबद्ध हुकूमशाही परवडली, असे लोकांना वाटू लागले. शिवाय माओचे लोकशाही सरकारचे आश्वासन होतेच. सोव्हिएट तळांविषयी आकर्षण वाढू लागले आणि पुन्हा एकदा विद्यार्थी, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, डॉक्टर्स, इंजिनियर्स यांची मोठ्या प्रमाणावर लाल तळांच्या दिशेने रीघ लागू लागली.

## अखेरची निर्मूलन–मोहीम

जनरल मार्शलने मोठ्या जिकिरीने घडवून आणलेली युद्धबंदी फार तर महिनाभर टिकली. ही युद्धबंदी म्हणजे दोन्ही सैन्यांच्या सहनशीलतेचा अंतच होता. सर्व चीनभर ठिकठिकाणी दोन्ही सेना आपापले मोर्चे बांधून समोरासमोर उभ्या होत्या. अमाप विद्युत्शक्तीने भारलेले प्रचंड ढग एकमेकांना घासून जात असताना अधूनमधून गडगडाट होऊन विजा लखलखाव्यात त्याप्रमाणे ठिकठिकाणी सारख्या चकमकी होत होत्या, पुढे येणाऱ्या प्रचंड झंझावाती वादळाची ती पूर्वसूचना होती. सर्व वातावरण भारले होते. स्फोट केव्हा होतो याचीच वाट होती. चिनी इतिहासातील महत्त्वाचा क्षण येऊन ठेपला होता.

आणि प्रचंड स्फोट झाला. आतापर्यंत स्थगित ठेवलेली कम्युनिस्ट निर्मूलनाची आपली अखेरची मोहीम जानेवारी १९४७ मध्ये जनरॅलिसिमो चँग-कै-शेकने अधिकृतरीत्या सुरू केली. देशातल्या सर्व भागांतील लाल सेनांवर लाखांच्या संख्येने कोमिन्टांग सेना एकदम तुटून पडल्या. आपली शेवटचीच मोहीम म्हणून चँगने सारी शक्ती पणाला लावायचे ठरविले.

आणि कम्युनिस्टही ही शेवटचीच मोहीम मानीत होते. ही निर्णायक मोहीम होती. तीमध्ये ते जर पराभूत झाले तर कायमचे गाडले जाणार होते. त्यांच्या जीवनमरणाचा हा प्रश्न होता.

नागरी युद्धाची परिणती आता पूर्ण स्वरूपाच्या युद्धात झाली होती. 'जिंकू किंवा मरू' या आवेशाने कम्युनिस्ट आणि कोमिन्टांग दोघेही लढत होते. चीनमध्ये चहू बाजूंनी आता मोठ्या युद्धाला तोंड लागले होते. ●

( अपूर्ण )

## पुस्तके

'पाश्चात्त्य जीवनाच्या पार्श्वभूमीवरील स्वतंत्र कादंबरी' असे वर्णन वाचून मोठ्या उत्सुकतेने ही कादंबरी वाचायला घेतली नि वाचून संपवली. मराठी विनोदाच्या क्षेत्रात स्वतःचे निश्चित स्थान निर्माण करीत असलेले श्री. रमेश मंत्री साहित्याच्या अन्य प्रांतांत काय कामगिरी करतात हे पाहणे हाही एक उत्सुकतेचा भाग होताच.

श्रीकांत प्रधान या महाराष्ट्रीय तरुणाच्या लंडनमधील अनुभवांची ही कथा आहे. लंडनच्या जीवनाचे, तिथल्या वातावरणाचे, तिथल्या माणसांचे त्याच्यावर होणारे परिणाम नि त्याच्या प्रतिक्रियांतून घडत जाणारे जीवनानुभव या कादंबरीत दिसतात. त्यात एका कथेचे सूत्रही आहे. अॅना ही डच सुंदरी अगदी योगायोगाने श्रीकांतला भेटते. शेवटची टयूब रेल्वे चुकल्यामुळे दोघेही भुयारी रेल्वे स्टेशनात अडकून राहतात आणि त्यातून त्यांचा परिचय होतो. प्रथमभेटीतच तिच्या मोहक व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव त्याच्यावर पडतो. पुन्हा तिची भेट होण्याची उत्कट इच्छा मनात निर्माण होते; आणि तिची भेट होते ती अगदी विचित्र परिस्थितीत. सुटीत पैसे मिळविण्यासाठी श्रीकांतने कंडक्टरची नोकरी धरलेली असते. लंडनमध्ये कोणतेही काम कमी दर्जाचे मानले गेले नसले तरी श्रीकांतला आपल्या हलक्या कामाची लाज

## म हा न ग र

वाटत असते. आणि नेमक्या याच वेळी अॅना त्याला भेटते. आपल्याला त्या स्थितीत तिने पाहावे, याची त्याला भयंकर लाज आणि शरम वाटते. तिच्याशी तो धड बोलूही शकत नाही. याच गोष्टीचा अॅनावर चांगला परिणाम होतो. श्रीकांतच्या दृष्टीने त्याच्या जीवनातील सर्वांत महत्त्वाची व्यक्ती आपण आहोत हे तिला जाणवते. त्याच्या या भावनेला साधे माणुसकीचे उत्तर म्हणून ती त्याला भेटू लागते आणि दोघांत हळूहळू प्रेमबंध निर्माण होतो. दोघे वारंवार भेटतात, चर्चा करतात, जत्रेला जातात, ८–१५ दिवस एकत्र 'हिच्‌हायकिंग'ही करतात. अॅनाच्या जीवनात २–३ पुरुषांशी तिचा संबंध येऊन गेलेला असतो. मात्र तो फक्त शारीरिकच असतो. श्रीकांतची गोष्ट वेगळी असते. ती त्याच्या प्रेमात पडलेली असते. या प्रेमाचा खराखुरा संपूर्ण अनुभव घ्यावा म्हणून शारीरिक सुखापासून ती त्याला दूरच ठेवते. अखेर १५ दिवस ती त्याच्याकडे राहायलाच येते, तेव्हा एके दिवशी हाही दुरावा नाहीसा होतो आणि त्यांच्या मीलनाला सर्व दृष्टींनी पूर्णता येते. अॅनाच्या मनाला आता लग्नाचे वेध लागतात. श्रीकांतशी आपले लग्न होणार हे तिने गृहीत धरलेलेच असते. फक्त ते लौकर उरकून घेण्याचे ती श्रीकांतला सुचवते. श्रीकांतची परिस्थिती मात्र भिन्न असते. तो विवाहित असतो. भारतात त्याची पत्नी असते. परंतु प्रथम हा विषयच निघाला नाही, म्हणून आणि नंतर अॅनाच्या प्राप्तीच्या मोहाने त्याने तिला आपण विवाहित असल्याचे सांगितलेले नसते. त्यामुळे जेव्हा ती लग्नाचा विषय काढते, तेव्हा त्याच्यापुढे समस्या उभी राहते. "लग्नं स्वर्गात लागत नाहीत. ती खडबडीत जमिनीवर, पृथ्वीवर लागतात. लग्न म्हटलं की राहायचं कुठं, नोकरी काय करायची, मुलाबाळांचं काय करायचं, असे अनेक व्यावहारिक प्रश्न निर्माण होतात. दोघांमध्ये होणारी एकतानता प्रेमिकांना पुरेशी असते. पण लग्नाला मात्र भोवतालच्या जगाचा पदोपदी विचार करावा लागतो." याप्रमाणे अॅनाची समजूत घालून भिन्न संस्कृतींमुळे वैवाहिक जीवन आपल्याला कसे अशक्य आणि असह्य होईल, हे तो तिला पटवून देतो. तिला ते पटले नाही, मानवले नाही तरी त्याच्या-साठी ती पटवून घेते. आक्रंदणाऱ्या हृदयाने त्याच्यापासून दूर होते, फ्रान्सला जाऊन राहते. तथापि श्रीकांतलाच राहवत नाही. आपण तिच्यावर अन्याय केला, असे त्याला वाटत राहते. त्याचे मन त्याला खात राहते. तो मुद्दाम पॅरिसला जाऊन तिला भेटतो

आणि आपण विवाहित असल्याचे तिला सांगतो. तिला धक्का बसतो; पण त्याच्या प्रामाणिकपणाचे प्रत्यंतर आल्याने तिचे प्रेम अविचलच राहते.

## ॲनाचे प्रभावी व्यक्तिचित्रण

अशा तऱ्हेने नव्या पार्श्वभूमीप्रमाणेच कथेच्या वाटचालीत आणि गतीतही नावीन्य आणण्याचा श्री. रमेश मंत्री यांनी प्रयत्न केला आहे. विवाहित पुरुषाच्या नादी लागणाऱ्या कुठल्याही स्त्रीप्रमाणेच ॲनाच्या प्रेमाची परिणती होत असली, तरी प्रेम करण्याच्या, व्यावहारिक जगाशी त्याची सांगड घालण्याच्या आणि त्याची अखेर स्वीकारण्याच्या तिच्या पद्धतीत निश्चितच फरक आहे; किंबहुना ॲनाचें व्यक्तिचित्रण हाच या कादंबरीच्या आकर्षकपणातील सर्वांत मोठा भाग आहे. कादंबरीची नायिका या दृष्टीने ही ॲना लेखकाने फार चांगली निर्माण केली आहे. प्रमाणबद्ध घाटदार शरीराची नि मुलायम कांतीची ही डच सुंदरी बुद्धीने, अनुभवाने आणि विचारसरणीने 'असामान्य' आहे. जीवनातील प्रत्येक गोष्टीचा, प्रसंगाचा शुद्ध वस्तुनिष्ठ भूमिकेवरून विचार करण्याची तिला सवय आहे. त्यामुळे 'तुझ्या या मित्राला बसस्टॉपवर सोडून देऊ. तू माझ्या फ्लॅटवर ये. रात्रभर मजा करू. येतेस?' असे सरळसरळ विचारणाऱ्या मोटारवाल्यावरही ती रागवत नाही. उलट 'त्यात रागवायचं कशाला? पुरुषानं स्त्रीसुख मिळवायचा प्रयत्न करावा, हे साहजिकच आहे. जगात असं चालायचंच. त्यासाठी त्यानं जुलूमजबरदस्ती करू नये, एवढंच मला वाटतं.' असं स्वतःच त्याचे समर्थनही करते. तिची अशी वस्तुनिष्ठ मनोभूमिका बनावयास तिचे आयुष्यच कारण ठरलें आहे. तिच्या लहानशा आयुष्यात तिला फार मोठे अनुभव आलेले आहेत. जीवन गदगदा हालविणारे. धरणाचे काम पाण्याची पर्वा न करता जिद्दीने करीत असता तिचे वडील पाण्यात वाहून गेले. नुकतेच तारुण्यात पदार्पण केलेली मुग्ध किशोरी असतानाच ॲनावर अमानुष बलात्कार झाला. या प्रसंगाचा तिच्या संवेदनाक्षम मनावर खोल परिणाम झाला. विचार करण्याची सवय लागली. तशीच एखाद्या क्षणाच्या प्रभावाने सर्वस्व झोकून देण्याची वृत्तीही निर्माण झाली. एखादा क्षण तिच्या आयुष्यात असा येई की, तिथून तिच्या जीवनाचा ओघ एकदम निराळे वळण घेई. त्या क्षणाचा प्रभाव तिच्यावर अनिवार ठरे. तिच्या मनाची बैठक अशी घडली होती. म्हणूनच तिच्याकडे अजीजीने सहवाससुख मागणाऱ्या निग्रोच्या खोलीवर तिने एक रात्र काढली! "त्या क्षणी माझ्या मनात जे अनेक विचार आले, त्यांपैकी एक असा होता—की अनेक वर्षांपूर्वी एका घटिंगणानं बळजबरीनं माझ्यावर अत्याचार केलाच ना? मग आता इतक्या उत्साहानं, अजीजीनं तेच मागणाऱ्या या तरुणाला मी कशाला नकार द्यावा?" असा विचार ती करू शकते! पण ती चंचल नाही. थिल्लर नाही. तिचा एक जीवनविषयक दृष्टिकोन ठरलेला आहे. "आपलं सारं आयुष्य म्हणजे अनंत कालातला

एक क्षण आहे. ही विशाल जाणीव ज़र मनावर ठसली, तर दैनंदिन जीवनातली सुखदु:खं लहान होतात...आता मानवाचा परमोच्च आनंद केवळ शारीरिक राहिलेला नाही. उत्कृष्ट संगीत, अभिजात साहित्य, अलौकिक चित्रकला किंवा गणित शास्त्रातला एखादा पेचही त्याला परम आनंद देऊ शकतो...आणि तरीही माणसांनी शारीरिक आनंदांना मुळीच कमी लेखू नये; कारण अखेर माणसं हीसुद्धा पशूच आहेत–एकप्रकारचे प्राणीच आहेत." अशा तऱ्हेच्या विचारसरणीचे तिचे व्यक्तिमत्त्व बनले आहे. त्यामुळेच ती जीवनाचा खऱ्या अर्थाने उपभोग घेऊ शकते, आस्वाद घेऊ शकते नि त्याचबरोबर खिलाडू वृत्तीने पराभवही स्वीकारू शकते. भावनाशील असूनही विचारप्रवण असणाऱ्या रसिक, बुद्धिमान सुंदरीचे हे आकर्षक व्यक्तिमत्त्व आहे.

किंबहुना हे व्यक्तिमत्त्व इतके परिपूर्ण आहे, इतके प्रभावी आहे की, लेखकालाच ते नीटसे पेललेले नाही. त्याचा हवा तसा, हव्या त्या परिणामकारकतेने उपयोग करून घेतला गेला नाही. कादंबरीतील सर्व घटना, प्रसंग आणि नायक केवळ ॲनाच्या व्यक्तिमत्त्वामागे फरफटत जातात. ते व्यक्तिमत्त्व इतके प्रभावी ठरते की, कादंबरीच्या सर्व प्रवाहावरच त्याचा प्रभाव पडतो आणि त्याच्याशी समतोल राखणारे काही नसल्यामुळे हा प्रभाव हवा तितका परिणामकारक ठरत नाही. एकांगी वाटतो. त्यामुळेच ॲनाची व्यक्तिरेखा बहुरंगी असली, प्रभावी असली तरी विकासक्षम नाही; विकसित व्हायला तिला वावच मिळालेला नाही.

## जाणवणारा विस्कळीतपणा

ॲनाच्या व्यक्तिचित्राशिवाय या कादंबरीतील दुसरी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे विविध प्रसंगांच्या निमित्ताने व्यक्त होणारे सुंदर विचार आणि त्यांचे सखोल विवरण. कादंबरीचा नायक विचारशील अभ्यासू तरुण असल्याने त्याच्या मनात आणि सहकाऱ्यांशी होणाऱ्या त्याच्या चर्चांमधून अनेक विचारमौक्तिके निर्माण होतात. तत्त्वचर्चा होते. कादंबरीच्या कथानकाच्या गतीशी त्यांचा संबंध असतोच असे नाही. पण रसिक बुद्धिवंतांची ही चर्चा असल्याने ती उद्बोधक व आल्हादक ठरते. पाश्चात्य वातावरणातील व्यक्तींचा जीवनासंबंधीचा विचार आणि पर्यायाने नायकाच्या मनावर, वृत्तीवर, विचारांवर घडणारे परिणाम तोलण्यासाठीही त्यांचा उपयोग होतो. जीवन, माणूस आणि कला यांच्या परस्परसंबंधांविषयी समवयस्क भिन्नसंस्कारी मित्रांच्या चर्चेमधून नेहमीच तत्त्वबोधाचे नवनीत बाहेर पडते. या चर्चा अनेक प्रकारच्या आहेत. काहीही नीतिबंधन नसणाऱ्या मुक्त समाजापासून तो मॉडर्न आर्टपर्यंत ! कलेच्या आकाराने जीवन कसे परिपूर्ण बनवावे आणि जीवन जगण्याची कला कशी साध्य करून घ्यावी, याविषयी लेखकाला सुचणारे विविध विचार कादंबरीत चतुराईने गुंफले आहेत. मूर ह्या चित्रकारासारखी पात्रे किंवा

प्रोफेसरांच्या घरच्या पार्टीसारखे प्रसंग त्यासाठी मुद्दाम निर्माण केले आहेत. फार काय, ॲना व श्रीकांत यांच्या एकांतातही श्रृंगाराबरोबरच अशा चर्चाही फुलत जातात. अर्थात त्या कुठेच कंटाळवाण्या वाटत नाहीत हेही खरे.

पण ह्यांमुळे कादंबरी काहीशी विस्कळीत होते. संगतवार फुलत नाही. पाकळी-पाकळीने उमलत नाही.

## वातावरणनिर्मिती का माहितीपत्रक !

लेखक स्वतः पाश्चात्त्य देशांत काही काळ राहून आला आहे. तिथले जीवन त्याने जवळून पाहिले आहे; अनुभवले आहे. कादंबरीच्या ' जिवंत ' पणासाठी अस्सल वातावरणनिर्मिती होण्यास हे उपयोगी आहे. पण अस्सल वातावरणनिर्मिती म्हणजे अनावश्यक तपशिलांची यादी नव्हे. चार-दोन ठळक गोष्टींचे वर्णन कुशल लेखकाने अशा सहजतेने जाता-जाता करावयास हवे, की वाचकांच्या डोळ्यांपुढे साक्षात परिसर उभा राहावयास हवा. या जाणिवेचा प्रस्तुत कादंबरीत अभाव आढळतो. काही काही वर्णने तर आपल्याला लंडनची किंवा पाश्चात्त्य जीवनाची किती माहिती आहे हे दाखविण्यासाठीच घातली आहेत की काय, असे वाटू लागते. ही कादंबरी आहे, हे काही श्रीकांताचे प्रवासवर्णन नाही. कादंबरीत ठळक घटनांचा आणि विशेष प्रसंगांचा धावता चित्रपट असावा. मधल्या काळात मुख्य पात्राने काय काय केले त्याच्या तपशिलाची वाचकाला जरुरी नसते; परंतु येथे मात्र, ॲनाची ओळख झाल्यापासून तिची कायमची ताटातूट होईपर्यंतचा श्रीकांतचा रोजचा कार्यक्रम आवर्जून दिला आहे. ॲना आणि श्रीकांतच्या ' हिच्‌हायकिंग 'चे वर्णनही असेच. त्या प्रवासात दोघांनी केलेली जणू प्रत्येक हालचाल तत्परतेने नोंदून ठेवली आहे. " त्यानं पट्‌कन दाढी केली आणि दोन चादरी, तीन शर्ट असे कपडे गोळा केले. कारण ' लाँड्रेट 'मध्ये यंत्रात स्वतःच कपडे घालायचे आणि बटनं दाबून ते स्वतःच धुवायचे. त्यासाठी नऊ पौंड वजनाचे कपडे एका वेळी देता येतात. "—ही काय वातावरण-निर्मिती, की लंडनचे माहितीपत्रक ?

" लंडनच्या सार्वजनिक मुताऱ्या पुरुषांना मोफत असतात; पण बायकांना एक पेनी टाकावी लागते " ही माहिती ॲनाने श्रीकांतला सांगावी काय ? आणि प्रत्यक्षात एखादे वेळी सांगितली असेल तरी हे संभाषण कादंबरीत अंतर्भूत केल्याने काय साधते ? नाताळच्या रात्रीचे वर्णन, प्रोफेसरांच्या घरची पार्टी, ' बीटनिक ' मंडळींची चर्पटपंजरी, जत्रेचे वर्णन वगैरे भाग सांगितला आहे आकर्षक पद्धतीने. पण त्याचा कथासूत्राशी काहीही संबंध नाही.

कदाचित् असे असू शकेल, किंवा ' महानगर ' हेच कादंबरीचे नावही असल्याने असे म्हणता येईल की या कादंबरीत कथासूत्राला अजिबात महत्त्व नसून लंडन शहराच्या व्यक्तित्वालाच कादंबरीत प्राधान्य आहे. वरील प्रसंग कथासूत्राच्या

दृष्टीने महत्त्वाचे असले तरी लंडनच्या व्यक्तित्वाच्या वेगवेगळ्या बाजू दाखविण्यासाठी ते उपयोगी पडतात. फार काय, असेही म्हटले जाण्याचा संभव आहे, की कथासूत्र हाच या व्यक्तित्वदर्शनाचाच एक भाग आहे. लंडनच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्याचे एक साधन एवढेच कथासूत्राचे या कादंबरीत कार्य आहे. तथापि हे तितकेसे पटणारे नाही; कारण मग सर्व कादंबरीची रचनाच वेगळ्या प्रकारे व्हावयास हवी होती. ‘लंडनच्या पार्श्वभूमीवर आधारलेली सामाजिक कादंबरी’ असे म्हणण्याऐवजी ‘कादंबरीमय लंडन’ असेच मग तिला म्हणावयास हवे. पाश्चात्त्य देशांतील वातावरण, चालीरीती वगैरेंविषयी उत्सुकता असणाऱ्यांचे मात्र ही कादंबरी निश्चितच समाधान करील. तिथल्या जीवनातील नैतिक शिथिलता, तथापि खोट्या दडपणांचा भस्मासुर निर्माण न करता जीवनाचा स्वतंत्र बुद्धीने वस्तुनिष्ठ भूमिकेवरून विचार करण्याची सवय, सत्याला सर्वांनीच सत्य मानून सामावून घेणे, या गोष्टींच्या या कादंबरीतील चित्रणाने विचारशील माणसाच्या विचारांनाही चालनाच मिळेल.

—निशिकांत मिरजकर

●

[‘महानगर’—रमेश मंत्री—मूल्य दहा रुपये : मॅजेस्टिक बुक स्टॉल : पृष्ठे २६१]


लाल महाल प्रतापगड पन्हाळगड

राजगड पुरंदर आग्रा

मुजऱ्याचे मानकरी

लेखक : ब. मो. पुरंदरे : मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २

सुधाकर राजे

# भिंतीच्या तुंबड्या

## □ आधी व्होटिंग करा, मग सौख्यभरे नांदा

तानाजी मालुसरे सर्रकन् म्यान्यातून तरवार काढून शिवछत्रपतींना मुजरा करून म्हणाला, " महाराज, आधी व्होटिंग करून येतो, मग रायबाचे लगीन !" महाराज म्हणाले, " शाबास, गड्या ! इकडे भटजी पाण्यात भांडे बुडवून बसला आहे, पण तिकडे प्रिसायडिंग ऑफिसर हातांत व्होटिंग पेपर घेऊन खोळंबला आहे; अन् या दोघांत भटजीपेक्षा प्रिसायडिंग ऑफिसर जास्त महत्त्वाची असामी आहे. कारण भटजी हा ऑर्डिनरी परमेश्वराचा प्रतिनिधी आहे, तर प्रिसायडिंग ऑफिसर पाचामुखींच्या म्हणजे पॉप्युलर परमेश्वराचा प्रतिनिधी आहे. तेव्हा पळ, लायनीत जाऊन उभा राहा......"

अर्थात् हे संभाषण काही घडलेल्या इतिहासातले नाही—पण ते घडू शकणाऱ्या इतिहासातले आहे. समजा, तीनशे वर्षांपूर्वी स्वातंत्र्यासाठी घातपात करणारे शिवाजी महाराज आज तीनशे वर्षांनंतर अहिंसावादी स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडणुकीला उभे राहिले असते तर आपला इलेक्शन एजंट म्हणून काम करणाऱ्या तानाजी मालुसरेला असेच काही तरी म्हणाले असते एवढे मात्र नक्की. रायबाच्या सुदैवाने त्याच्या काळी निवडणुका नसल्यामुळे कोंडाणा घेण्यासारखी क्षुल्लक बाबच त्याच्या लग्नाच्या आड येऊ शकली. पण यंदाच्या निवडणुकीमुळे तर बऱ्याच जणांना सौख्यभरे नांदायला उशीर लागला असे वर्तमानपत्रांत वाचले. गुजराथेत तीन नवरदेव म्हणे लग्नाचा साज चढवूनच आधी मत द्यायला गेले, तर आणखी कोठे तरी एका नवऱ्या मुलीने चक्क भटजीपासून नवऱ्या मुलापर्यंत सगळ्यांना तिष्ठत ठेवून पोलिंग स्टेशन गाठले. निवडणुकीची लगीनघाई म्हणतात ती हीच असावी.

## □ योजनाबद्ध दिरंगाई

कुठलीही गोष्ट करताना ती अगदी विचारपूर्वक करावी, घाई करू नये, असे थोरामोठ्यांनी सांगून ठेवले आहे. हा उपदेश भारत सरकारच्या राज्यात तंतोतंत पाळला जात असतो. आपल्याकडे पेन्शनर मेल्यावर पेन्शन मंजूर झाल्याच्या कथा आहेत, त्याप्रमाणे आजोबाने केलेल्या फिर्यादीचा निकाल (किंवा बुक केलेली मोटारगाडी किंवा मागितलेला टेलिफोन) नातवाच्या हयातीत मिळाल्याचीही उज्ज्वल उदाहरणे आहेत. त्यात आता आणखी एक प्रशंसनीय भर पडली आहे. परवा वर्तमानपत्रांत वाचले की, १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर दाखल केलेल्या दोन तक्रारींचा निवाडा अजून—१९६७ च्या निवडणुका संपल्या तरी—लागायचा आहे.

अर्थात् हे विवेकीपणाचे तर उत्कृष्ट उदाहरण आहेच, पण आपली पंचवार्षिक योजनवर अढळ श्रद्धा आहे हेही यावरून सिद्ध होते. कारण, निवाडा देण्याच्या बाबतीतही निवडणूक मंडळाने पंचवार्षिक योजना आखलेली दिसते. माझ्या मते दिरंगाईतदेखील इतकी योजनाबद्धता असणे आपल्याला भूषणावहच आहे.—पण माझा एक फटकळ मित्र म्हणतो, अती शहाणा त्याचे दोन्ही बैल रिकामे.

## □ उदरभरण नोहे, जाणिजे वैद्यकर्म

माणसाने खादाडपणा केला की तो लठ्ठ होतो अशी माझी खात्री होती. आणि ही खात्री माझे स्वतःचे पोट सुटेपर्यंत टिकली. त्यानंतर मात्र माणसाच्या लठ्ठपणाचे काही तरी गूढ वैज्ञानिक कारण असावे, अशी मला दाट शंका येऊ लागली आहे. आणि नेमकी हीच शंका दूर करण्यासाठी लंडनला एक प्रयोग चालू आहे. लंडन विश्वविद्यालयाचे दहा—बारा निवडक विद्यार्थी सध्या दिवसातून चौदा वेळा जेवण्याचा प्रयोग करून पाहत आहेत व या भोजन—भाऊंची वैद्यकीय तपासणी चालू ठेवून लठ्ठपणाचे रहस्य उलगडायचा तेथले शास्त्रज्ञ प्रयत्न करीत आहेत. आता मला स्वतःला दिवसातून चौदा वेळा जेवल्याचे नक्की स्मरण नाही, पण कुठल्याही रोगावर दर तीन—चार तासांनी औषधाचा डोस घ्यावा लागतो, त्याप्रमाणे लठ्ठपणाच्या रोगावर उतारा शोधून काढण्यासाठी तासातासाने भरपेट जेवणाचा डोस घ्यायची कल्पना आपल्याला एकदम पसंत आहे; कारण हे उदरभरण नोहे जाणिजे वैद्यकर्म.

## □ लष्कराचा पाव भाजणे

कोणे एके काळी सैन्यातल्या माणसाचे काम लढाई करण्याचे होते. पण आता ते संकुचितपणाचे दिवस गेले. हल्लीचा सैनिक फक्त लढाई सोडून इतर अनेक कामांत गढलेला दिसतो. हिंदुस्थानातले सैनिक पूरग्रस्तांना रसद पोचविणे किंवा उलट अवर्षणग्रस्तांना पाणी पुरविणे असली कामे नित्यनेमाने करीत असतात. आता ते लष्करच्या भाकऱ्या भाजतात की नाही हे माहीत नाही. पण ग्रीसमध्ये काही दिवसांपूर्वी बेकरीवाल्यांनी संप केला, तेव्हा तेथल्या सैनिकांनी शत्रूची कणीक तिंबायच्याऐवजी गव्हाची कणीक तिंबून पाव भाजायचा पराक्रम करून दाखवला. कहर म्हणजे ब्रिटिश हवाई दलातल्या मंडळींना आता 'बर्ड वॉचिंग' शिकवणार आहेत. विमानतळावर कुठल्या पक्ष्यांमुळे विमानांना धोका निर्माण होऊ शकतो व ते पक्षी कुठल्या बुजगावण्याने दूर ठेवता येतील हे कळावे म्हणून हे 'पक्षी—विज्ञान' शिकविण्यात येणार आहे. आता बोला, जो सैनिक लष्करचे पाव भाजण्याचे व कावळे चिमण्या हाकलण्याचे काम करू शकेल, त्याला अशक्य काय आहे? अर्थात् स्थलपरत्वे त्याच्या मर्दुमकीत थोडाफार फरक पडेल एवढेच. उदाहरणार्थ, ग्रीससारखा प्रसंग अमेरिकेत उद्‌भवला तर अमेरिकन सैनिकाला हॉट् डॉग व हॅम्बर्गर तळावे लागतील. इंग्लंडमध्ये तर ज्या सैनिकाचे सँडविच सर्वोत्कृष्ट ठरेल, त्याला एलिझाबेथ क्रॉस मिळू शकेल. ●


# व्हिएटनामच्या युद्धभूमीवर

माझ्या पहिल्या मोहिमेनंतर प्लेकूच्या तळावर मी दोन-तीन दिवस स्वस्थ बसून होतो. मला अमेरिकनांचा व्हिएटकाँगशी होणारा प्रत्यक्ष मुकाबला चित्रीत करायला अजून मिळाला नव्हता. मी वाट पाहत होतो. एवढ्यात तळावरच्या संपर्क अधिकाऱ्यानं सांगितलं की, प्लेकूहून बामीथुट [ Ban Me thout ] तळावर सबंध लष्करी सामग्री हलवली जाणार आहे आणि 'बामीथुट'हून एक नवी मोहीम सुरू व्हायची आहे.

मी पुन्हा तयार झालो. विमानतळावर मोठमोठे रणगाडे, ट्रक्स, जीप्स आणून उभ्या केलेल्या होत्या. सी-१३० जातीची प्रचंड विमानं रणगाड्यांची अवजड धुडं आपल्या पोटात सामावून घेत होती. एका भल्या मोठ्या रणगाड्याबरोबर मला एका सी-१३० विमानात बसवण्यात आलं ! आयुष्यात प्रथमच असला 'प्रचंड' सहप्रवासी मला विमानात भेटला ! प्लेकू ते बामीथुटपर्यंत तो रणगाडा आणि मी अगदी 'शहाण्या मुला'सारखे गप्प बसून होतो.

दिवसभर वीस विमानं प्लेकूपासून बामीथुटपर्यंत सबंध लष्करी यंत्रणा आणून सोडत होती. अमेरिका व्हिएटनामच्या युद्धात कसा पाण्यासारखा पैसा खर्च करते आहे याची कल्पना यायला हे एक उदाहरण पुरेसं आहे.

मी बामीथुटला पोचलो त्याच्या दुसऱ्या दिवशी 'गारफिल्ड ऑपरेशन' नावाची मोहीम सुरू होणार होती. ठरल्याप्रमाणं मी भल्या सकाळी कॅमेऱ्यासह हजर झालो. हेलिकॉप्टर्स आली. आम्ही पळत पळत जाऊन बसलो. त्यांच्या संकेतस्थळी हेलि-कॉप्टर्स उतरायला लागली. आम्ही उतरायला लागताच बाजूच्या जंगलांतून एका-एकी मशिनगनचा मारा सुरू झाला. आम्ही भराभर आडोसा घेतला. सैनिक पटापट खंदकात उड्या मारून प्रत्युत्तराला सज्ज झाले. सुमारे तीस सेकंदांतच मशिनगन



निवेदन : विजय परुळकर

लेखक : अनिल हवालदार

या वेळी माझा मुक्काम आन्खे या तळावर होता. येथूनच 'ऑपरेशन मॅशर' आणि 'ऑपरेशन व्हाइटविंग' या दोन मोहीमा निघणार होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजताच मी कॅमेऱ्यासह तयार झालो. 'हुई' हेलिकॉप्टर्सनी आम्हाला योग्य ठिकाणी टाकल्यावर ती दिसेनाशी झाली. आणि आमची मोहीम चालू झाली. दिवसभर ७-८ मैलांची रपेट केल्यावर संध्याकाळी आम्ही एका टेकाडावर पोचलो. एवढ्या खटाटोपात फारच थोडे चित्रीकरण माझ्या पदरात पडले होते. दुसऱ्यादिवशी त्याच मोहीमेबरोबर पुढे जाण्याच्या विचाराने मी बेसवर परतलो आणि ... ... ...

थांबली. व्हिएटकाँगचा पहिला हल्ला मी प्रत्यक्ष अनुभवला. सुदैवाने मला त्या प्रसंगाची फिल्म घेता आली.

अमेरिकन सैनिकांनी त्या मशिनगनच्या आवाजाच्या दिशेने गोळ्यांचा अक्षरशः पाऊस पाडला. पण सारं सामसूम ! व्हिएटकाँगची हीच तर गंमत आहे. एखाद–दुसरा व्हिएटकाँग अमेरिकनांना बघतो. त्यांना बेसावध पाहून गोळीबार करतो. दोन-चार मेले तर उत्तम ! नाहीतर ताबडतोब पसार होतो. समोरासमोर लढायला सहसा येत नाही.

व्हिएटकाँगच्या हल्ल्यामुळं माझ्याबरोबरच्या अमेरिकन तुकडीत चैतन्य निर्माण झालं होतं. त्यांच्या आगमनाची चाहूल व्हिएटकाँगना लागली होती. पुन्हा कुठल्या क्षणी हल्ला होईल, याची खात्री नव्हती. माझ्याजवळ कॅमेऱ्याशिवाय दुसरं 'शस्त्र' नव्हतं ! गोळ्यांचा पाऊस पडून केव्हा माझी चाळण होईल, याचा नेम नव्हता. अतिशय सावधगिरीनं आमची आगेकूच सुरू झाली. जवळ जवळ चार मैल आम्ही चालत होतो. सार्जंटनं संदेश पाठवले. विमानं येऊन आगलावे बाँब टाकून गेली. उखळी तोफा धडाडल्या. खेड्यात घुसलो आणि समोरचं दृश्य पाहून मी थिजलो. मॉर्टरच्या भडिमारानं भाजून निघालेली प्रेतं तिथं पडली होती. सैनिकांनी प्रेतं मोजली. ती सोळा होती. सोळा व्हिएटकाँग मारले, असा रिपोर्ट करण्यात आला. एव्हाना संध्याकाळ झाली होती.

## रात्रीचे चित्रीकरण

नंतर त्या तळावरील कंपनी कमांडरशी माझी ओळख करून देताच प्रथम त्यानं थंडगार बीअर मागवली आणि माझ्या तंबूची व्यवस्था केली. या पाहुणचारानं मी आता पुरा हबकलो. रात्रीच्या चित्रीकरणाची कल्पना माझ्या डोक्यातून साफ निघून गेली होती. मी तंबूत झोपलो, तेव्हा माझ्यापासून दहा फुटांवरच तोफखान्याच्या पाच तोफा आहेत याची मला कल्पना नव्हती !

जरा कुठं माझा डोळा लागत होता तोच शेजारच्या तोफा धडाडायला लागल्या. पटकन् मी कंपनी कमांडरला चित्रीकरणाची परवानगी विचारली. त्याने फक्त दहा सेकंद 'प्रकाश टाकायला' परवानगी दिली. मी कॅमेरा त्या तोफखान्यावर रोखला आणि पटकन दहा दहा सेकंदांचे दोन शॉटस् घेतले. रात्रीच्या युद्धाचं थोडंसं का होईना, चित्रीकरण करता आलं, या खुषीत मी पहाटे एक मस्त डुलकी घेतली.

सकाळी कोरियन 'वाघां'च्या बरोबर मोहिमेवर निघालो. हे कोरियन 'वाघ' अतिशय चपळाईनं हालचाली करतात. हल्ल्याच्या अगोदर अमेरिकनांच्याप्रमाणं हे विमानांची मदत घेत नाहीत. मी जणू मोहिमेतला सैनिक असल्याप्रमाणं प्लॅटून कमांडरनं मला अर्धा तास मोहिमेचा आराखडा समजावून सांगितला. मला काहीही समजत नव्हतं. पण समजल्यासारखी मी सारखी मान हलती ठेवली होती. कोरि-


यन सनिकांनी त्या खेड्यावर हल्ला केला आणि ते सरळ आत घुसले. खेड्यात कुणीही नव्हतं. कोरियन सैनिक व्हिएटनाममध्ये व्हिएटकाँगच्या पद्धतीनंच लढतात रात्रीच्या वेळी लढायची त्यांची तयारी असते ! त्यांच्या या पद्धतीनेच सबंध क्विन्यॉन प्रांत व्हिएटकाँगच्या तावडीतून कोरियनांनी अतिशय वेगात सोडवला. व्हिएटकाँग, कोरियन सैनिकांना अतिशय घाबरतात. सहसा ते त्यांच्या तळांवर हल्ला करायला येत नाहीत. ते खेडं कोरियनांनी ताब्यात घेतलं ! संध्याकाळी क्विन्यॉनला आलो आणि दुसऱ्या दिवशी सकाळी सायगावला परत आलो. आमची टीम दिल्लीला निघून गेली होती. मी फिल्म पाठवून दिली आणि शीण घालवण्यासाठी ' कॅराव्हेल 'च्या बारमध्ये शिरलो.

दुसऱ्या दिवशी आमच्या स्टुडिओकडून एक विचित्र तार आली. ' Night shooting not enough, try to cover more combat and in detail –'

माझं डोकंच फिरलं ! जिवावर उदार होऊन मी आतापर्यंत कसंबसं शुटिंग केलं होतं ! रात्रीचं चित्रीकरण युद्धभूमीवर करताना सैनिकांच्या जिवाला धोका होता. त्यामुळं पुन्हा मोहिमेवर ती सैनिक मंडळी माझं कितपत स्वागत करतील, याची मला शंका होती. ' जमलं तर शुटिंग करतो, ' अशी मी उलट तार केली आणि पुन्हा क्विन्यॉनची वाट धरली !

क्विन्यॉनच्या तळावर त्या कोरियन संपर्क अधिकाऱ्याला मी माझ्या स्टुडिओकडून आलेली तार दाखवली. त्यानं मला चित्रीकरणाला परवानगी देऊ नये, असं मनापासून वाटत होतं ! पण स्वारीवर त्या तारेचा भलताच परिणाम झाला. ' तुझ्या स्टुडिओनं सांगितलेलं काम केलंच पाहिजे ! मी तुझी सगळी व्यवस्था करतो ' असं म्हणून तो तजवीज करायला लागला ! मीं गोबॉम् खेड्यात येऊन पोचलो ! मनात सारखी धाकधूक होतीं. रात्रीच्या हल्ल्याचं चित्रीकरण करणं म्हणजे त्या सैनिकांच्या आणि माझ्या मरणाला आपणहून बोलावलं करणं होतं ! जमलं तर चित्रीकरण करायचं नाही तर तसंच खुशाल परत जायचं असं मी ठरवलं ! पण माझ्या मनातले विचार त्या अधिकाऱ्यानं ओळखले वाटतं ! माझ्या नोकरीची जणू त्यालाच काळजी लागली होती. त्यानं ' लाईट ' धरण्यासाठी एक मदतनीस माझ्या दिमतीला दिला. आता शुटिंग करण्याशिवाय मला गत्यंतर नव्हतं ! मी मॉर्टर लावल्या होत्या त्या जागी माझा मुक्काम टाकला ! तेवढीच सुरक्षित जागा ! समोरच्या शेताआडच्या झुडपात कोरियन वाघ लपले ! माझ्या उजव्या बाजूला मॉर्टरवाले आणि डाव्या बाजूला हेवी मशिनगनवाला बसला होता.

दोन तास लोटले. एकदम समोरून कुठूनतरी व्हिएटकाँगनी गोळीबार सुरू केला. मॉर्टर्स धडाडायला लागल्या. माझा मदतनीस सारखा दिवा लावायची घाई करायला लागला. मी एकदा देवाचं नाव घेतलं आणि त्याला दिवा लावायला सांगितला. मॉर्टर धडाडत असताना मी फिल्म घेऊं लागलो. फूटेत पाहिलं ! अशा वेळी बेटी



त्यांची ताकद पाहून मला घाम फुटला.

फिल्म लवकर संपत नाही! गोळ्या उडत होत्या. कानठळ्या बसत होत्या. मी भराभर कॅमेरा चालवत होतो. तीन रिळं संपवली! पहाट झाली होती! हल्ला संपला तरी सकाळ होईपर्यंत तिथंच बसणं भाग होतं! मी एक मस्त डुलकी घेतली. त्या रात्रीच्या चकमकीत आमच्या उजव्या बाजूचा एक सैनिक कोरियन गोळीनं जखमी झाला होता!

दुसऱ्या दिवशी तळावर मला टायक्वेंडो [TaekwoNdo] नावाचा कोरियाचा राष्ट्रीय खेळ पाहायला मिळाला. हातपायाच्या तळव्याची आतली बाजू आपटून आपटून घट्टे पडलेले असतात. कोरियन सैनिक हातांनी दगड फोडतात. सहा-सहा विटांची एका फटक्यात बुकणी करतात. चार-चार लाकडांच्या फळ्या पायाच्या एका फटक्यात फोडतात. त्यांची ती ताकद बघून मला घाम फुटला! दुपारी कोरियन जनरलबरोबर जेवण घेताना त्यानं सांगितलेल्या दोन कथा माझ्या अंतःकरणाला भिडल्या!

## विश्वासू कोरियन वाघ

कोरियन सैनिकांबद्दल व्हिएटनाममधल्या लोकांना किती विश्वास वाटतो याचं

त्यानं उदाहरण दिलं. क्विन्यॉनमधल्या एका खेड्यात व्हिएटकाँगचा फार त्रास होता. त्या लोकांकडून व्हिएटकाँग जबरीनं कर वसूल करायचे. त्यांना छळायचे! त्या खेड्यातल्या प्रमुखांनी विचारविनिमय केला. भाताची पिकं तोंडावर आली होती. ते सरळ कोरियन अधिकाऱ्यांना भेटले आणि त्यांनी संरक्षण मागितलं! ते खेडं डोंगराळ भागात आहे. कोरियनांच्या दिमतीला हेलिकॉप्टर्स अजिबात नाहीत. अशा परिस्थितीत त्या खेड्याला संरक्षण देणं अवघड होतं. जर व्हिएटकाँगनी रसद तोडली तर गेलेले सैनिक गेल्यातच जमा होते! पण हे 'वाघ' घाबरले नाहीत. त्यांनी त्या खेड्याला संरक्षण दिलंच! पिकं निघाली! कोरियन सैनिक त्या खेड्यातल्या लोकांना सर्व प्रकारची मदत करतात. त्यांच्याचबरोबर राहतात! या घटनेमुळे 'कोरियन वाघां'चा दबदबा वाढलाय! अमेरिकनांपेक्षा व्हिएटनामी लोक कोरियनांना जास्त विश्वासात घेतात.

सैनिकी कर्तव्य पार पाडताना निरपराध लोकांचा कसा काही वेळा बळी जातो याची दुसरी कथा त्या जनरलनं सांगितली. एका कोरियन कँपवर जवळ जवळ दीडशे खेडुतांचा जथा येत असलेला दिसला. अस्पष्ट उजेडात कँपवरच्या टेहळ्याला काही समजेना. त्याने दुर्बीण लावून पाहिली! सारे खेडुत-बायका-मुलं कँपकडे येत होती! लाऊडस्पीकरवरून सैनिकांनी त्या जमावाला थांबण्याचा आदेश दिला! तरी ती माणसं चालतच होती. पुन्हा इशारा दिला! माणसं जवळ आली होती! ती चालतच राहिली आणि त्यांच्या पाठीमागून कँपवर मॉर्टरचा हल्ला सुरू झाला! ताबडतोब कोरियन सैनिकांनी आगीचा वर्षाव केला. सर्व माणसं मारली गेली. जेव्हा प्रेतं पाहिली तेव्हा त्या खेडुतांच्या मागे व्हिएटकाँगच्या दोन तुकड्या मरून पडलेल्या आढळल्या! त्या निरपराध खेडुतांना बंदुकीच्या धाकावर व्हिएटकाँगनी 'आडोसा' म्हणून वापरलं होतं! त्या बिचाऱ्यांचा हकनाक बळी गेला! पण त्याला इलाज नव्हता! युद्धात हे असं चालतंच!

व्हिएटनाममध्ये या 'कोरियन वाघां'नी केलेल्या कामगिरीचं सर्वत्र कौतुक होतंय! त्यांच्या वाट्याला दिलेला क्विन्यॉन प्रांत त्यांनी मुक्त केला आहे. अवघी एक डिव्हिजन कोरियन सेना व्हिएटनामच्या भूमीवर लढते आहे. या डिसेंबरात आणखी कोरियन सेना आली की त्याचं कार्यक्षेत्र वाढेल. अतिशय कार्यक्षम, हसऱ्या चेहऱ्याचे, प्रेमळ स्वभावाचे हे 'कोरियन वाघ' मला फार आवडले. त्यांना आपल्या इंदिरा गांधींच्याबद्दल कमालीचं औत्सुक्य आहे. नेहरूंच्याबद्दल आदर आहे. एका अधिकाऱ्यानं लाजत लाजत मला इंदिरा गांधींचा स्वाक्षरी असलेला फोटो पाठवायला सांगितलं होतं! त्या बिचाऱ्याची मागणी मला पुरी करता आली नाही!

●

# तुमचे आकाश
# आठवड्याचा अंदाज



**श्री. गो. जोशी**
**सायनाचार्य, नासिक**
**१८ ते २४ मार्च १९६७**

**मेष** : या वेळची अंतरिक्षीय ग्रह-स्थिती आपणांस फारशी अनुकूल नसली तरी प्रयत्नाला साद घालणारी मनोवृत्ती तुमच्या ठिकाणी असल्यामुळे तुम्ही कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकाल. बुध एकादशात, शुक्र व्ययात एवढी अनुकूलताही तुम्हांला बस्स आहे. एवढ्या सहानुभूतीवरही आपण विक्रमी यश मिळवू शकाल.

साडेसातीच आहे त्यामुळे थोडीफार धावपळ, धडपड करावीच लागणार. ग्रहांच्या अनुकूलतेपेक्षा तुमची बेडर प्रवृत्तीच तुम्हांला या वेळी उपयोगी पडेल.

खर्च खूप वाढेल, प्रकृतीवर ताण पडेल, एकट्यानेच सारा व्यवहाराचा डोलारा तोलावा लागेल.

दि. १९ ते २१ प्रयत्नाला निश्चित यश मिळेल.

**वृषभ** : वृषभराशीची माणसे आधीच उदार, त्यातून मंगळासारखा उधळ्या ग्रह षष्ठस्थानी. या वेळी तुमच्या खर्चाला काही ताळतंत्रच राहणार नाही आणि अशा या मनोवृत्तीची परिणती शेवटी पश्चात्तापातच व्हायची ! 'दाता भगवान' हा तुमचा खाक्या या वेळी अंगाशी येण्याचा संभव आहे. अंदाज-पत्रक काटेकोरपणे अंमलात आण-ण्याची प्रतिज्ञा केलीत तरच संभाव्य

अनवस्था प्रसंग टळेल. एवढी सांपत्तिक बाब वगळली तर अन्य साऱ्या क्षेत्रांत तुमची प्रगतीची घोडदौड अनिबंधपणे चालूच राहील. जबाबदाऱ्या खूपच वाढतील आणि जिवाचे रान करून त्या पार पाडाव्या लागतील.

दि. १९ ते २१ महत्त्व प्रतिष्ठा वाढविणारा काल.

**मिथुन** : तुम्ही राजकीय क्षेत्रात वावरत असाल तर या वेळी तुमचा भाव वधारेल! तुमच्या सहकाऱ्यांना तुमच्या सल्ल्याची नितांत गरज भासू लागेल. राजकीय वर्तुळातील केंद्रस्थानी तुमचीच नियुक्ती होईल.

या वेळी अनेक ग्रह तुमच्या राशीच्या दशम–एकादशातून संचारत आहेत. ते पैसा, प्रतिष्ठा, यश, महत्त्व काय हवं ते देतील. हवं तितकं देतील !

तुमच्या जीवनात जे अनेक चांगले कालखंड आहेत त्या कालाची गणना करावी लागेल.

नवे व्यावसायिक क्षेत्र हाती येईल. अनेकांचे हार्दिक सहकार्य मिळेल. अत्यंत अवघड कामेही सहजपणे पार पाडली जातील.

दि. २२ ते २४ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कर्क** : चौथा मंगळ आणि तो वक्री. हा कुजस्तंभाचा काळ चांगला आहे असं कोणीच म्हणणार नाही. फक्त अशा काळी प्रयत्न तोकडे पडतात, कर्तृत्व काहीसे निष्प्रभ ठरते, विचार बोथट बनतात. हा अनिष्ट समजला जाणारा कुजस्तंभ ऑगस्टअखेरपर्यंत कमीअधिकपणाने जाणवणार असल्यामुळे या कालात काहीही न करता अगदी हात जोडून स्वस्थ बसा असं कसं म्हणता येईल ?

फक्त विचाराची कक्षा वाढवा, नम्रता-सहनशीलता पराकोटीची धारण करा आणि निर्धार-निष्ठेचे व्रत सतत आचरा. एवढे केलेत तर या प्रतिकूल वाटणाऱ्या कालातही अनंत चांगल्या प्रगत घटना घडू शकतात याचे प्रात्यक्षिक आपण जगाला दाखवू शकाल.

दि. १८–१९–२४ हा काल अपेक्षित यश देणारा जाणवेल.

**सिंह** : सध्याचा काल आपणांस इतका धाईगर्दीचा आहे की, गुरु-शनींच्या नाराजीची दखल घ्यायलाही तुम्हांला वेळ मिळू शकणार नाही. ग्रह अनुकूल असोत–प्रतिकूल असोत–सतत कार्य करीत असणे हा तुमचा स्थायीभाव आणि याच एका गुणाच्या सामर्थ्याने आपण गेल्या निवडणुकीत अनन्यसाधारण कार्य करू शकलात.

या आठवड्यात असंख्य कामांचे डोंगर उपसावे लागतील, भव्य योजना यशस्वी करण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

नोकरीधंद्यातील समस्या सुटू लागतील, अधिकाराचे स्थान मिळण्याची लक्षणे दिसायला लागतील. अनेकांचे हार्दिक सहकार्य मिळू लागेल.

दि. १९ ते २१ या कालाची नोंद करा.

**कन्या :** गुरू एकादशात असल्यावर दुसऱ्या मंगळाची डर नाही. याचा अर्थ हे दिवस प्रचंड लाभाचे आहेत, असे नव्हे; पण कुठेच नडणार नाही इतपत अनुकूल निश्चितच आहेत.

या आठवड्यात जा-ये, हिंडणे-फिरणे, दूरचा प्रवास असे फारच घडेल. त्यामुळे खर्च आणि दगदग वाढणार हे उघडच आहे. पण या वेळचे परिश्रम कारणी लागतील, धडपडीला यश येईल, वैचारिक संघर्ष मिटतील, व्यावसायिक प्रश्न सुटतील.

मंगलकार्याचे ठरेल, सामाजिक व राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या कार्याची जबाबदारी उचलावी लागेल.

दि. १८ ते २१ या काळी अनंत कामे हातावेगळी होतील.

**तूळ :** कुजस्तंभ आणि वक्री. त्याचे तुमच्याच राशीत वास्तव्य. या प्रखर योगामुळे अनेक ज्वलंत प्रश्न सोडवावे लागतील. धावपळ–धडपड तर इतकी होईल की, क्षणाची उसंत मिळणार नाही. बारीकसारीक विकारांनी प्रकृती बिघडेल, तर त्रस्त विचारांनी मनःशांती भंगेल. दशमस्थ गुरूच्या भरंवशावर विसंबून राहू नका.

नैतिक अधिष्ठानाची या वेळी नितांत गरज भासेल. तुमच्या आचारविचारांवर या मंगळाची करडी नजर आहे. तुमच्या चुका, तुमचा अनवधानपणा क्षम्य समजला जाणार नाही.

या आठवड्यात प्रकृतीला जपा आणि त्याहिपेक्षा अधिक जपा प्रतिष्ठेला. भावनेच्या भरात काहीही बोलाल आणि त्याचा पराचा कावळा होऊन बसेल.

दि. २२ ते २४ या काली काही अनुकूल घटना घडाव्यात.

**वृश्चिक :** मंगळ व्ययस्थानी, आणि त्याला वक्रीपणाची धार चढलेली. हा मंगळ केव्हा काय करील हे सांगताच येणार नाही. लक्ष्मी रुसेल, आडाखा फसेल.

अशा वेळी काहीही न करण्यासारखा शहाणपणा नाही. भाग्यस्थानी गुरू आहे या घमेंडीत जाऊ नका. अगदी ऐन आणिबाणीच्या वेळी तो भरंवशाचा गुरूही कानांवर हात ठेवील !

या वेळी प्रयत्नाची दिशा चुकेल, अपयश दार ठोठावू लागेल, सारी धावपळ निरर्थक ठरेल.

हाती घेतलेली कामे गती घेईनाशी होतील. मित्र, हितचिंतक तुमच्याबद्दल सर्वत्र गैरसमज निर्माण करू लागतील, स्थावराच्या समस्या, अनारोग्य, सांपत्तिक विवंचना इत्यादी प्रकारांनाही या वेळी तोंड द्यावे लागेल.

दि. २१ ते २४ थोडाफार अनुकूल काल.

**धनू :** चौथा शनी आठवा गुरू असे असूनही हे दिवस आपणांस तसे अनिष्ट जाणवणार नाहीत. थोड्याफार कष्टाने का होईना, सारी कामे अपेक्षेप्रमाणे यशस्वी ठरू लागतील.

या वेळी एवढेच पथ्य पाळा की, नव्या धंद्यात शिरण्याचे धाडस करू नका.

दूरचे प्रवास शक्यतो टाळा आणि कोणतेही महत्त्वाचे दीर्घ मुदतीचे करारमदार करू नका. हा काल वाटतो तितका चांगला नाही. तात्कालिक यश दिसेल, पण परिणामी अपयशाचेच धनी व्हाल.

स्थावराचे व्यवहार फारच सावधपणे करा. देण्याघेण्याच्या कामात तर विशेषच दक्षता बाळगा.

दि. २३ नंतर थोडेफार आशादायक वातावरण दिसू लागेल.

**मकर** : सध्या अजूनही काही दिवस मकरराशीचीच माणसे सतत आघाडीवर राहावीत अशीच नियतीची इच्छा दिसते. कुठेही गेलात तरी तुमचे स्वागतच होईल, काहीही आणि कसेही केले, तरी ती तुमची सर्वोत्कृष्ट कलाकृती म्हणून गौरव होईल. अनुकूल ग्रहस्थितीची ही किमया. या वेळी कसेही पाऊल टाकलेत तरी ते पवित्र्यातच पडेल.

नोकरीधंद्यांत प्रगती, लाभ-प्रतिष्ठा वाढेल; कलासाहित्याच्या क्षेत्रांत मानाचे स्थान मिळू शकेल. राजकीय क्षेत्रात फार मोठी जबाबदारी उचलावी लागेल. सांसारिक वातावरणात प्रसन्नता दरवळू लागेल.

दि. २० ते २२ लाभदायक दिवस.

**कुंभ** : साडेसातीत केव्हातरी एकदा उदरी शनी येतो म्हणतात, तो काल हाच. या वेळी गुरु-शनीचा त्रिकोण सुरू आहे. त्याच्या सहकार्याने आणि सहानुभूतीने तुमचे भवितव्य उजळेल. चारित्र्याला उत्थान मिळेल, प्रतिष्ठेची उंची अपेक्षेबाहेर वाढू लागेल.

या आठवड्यापासून नवे कार्यक्रम सुरू केले जातील आणि ते लवकरच अपेक्षे-बाहेर यशस्वीही ठरतील.

या वेळी आपण साडेसातीला विसरू शकता.

नोकरीधंद्यात अनपेक्षितपणे बरीच चांगली प्रगती होईल, व्यवहारधंद्याच्या तंत्रमंत्रात थोडाफार बदल करण्याचे ठरविलेत की, आपण विक्रमी यशाचे धनी व्हाल.

दि. १९ ते २१ अनेक चांगल्या गोष्टी या वेळी घडतील.

**मीन** : साडेसातीत मंगळ आठवा आणि त्यातूनही तो वक्री. सारे ग्रह उलटे फिरू लागल्यासारखे जाणवू लागेल. कुठेही जा, काहीही करा, सर्वत्र नकारघंटाच वाजू लागेल.

पण परिस्थिती अनुकूल नाही म्हणून स्वस्थ बसून थोडेच भागेल ? उलट मी म्हणेन की, अशा वेळी सारी शक्ति-बुद्धी पणाला लावून कामे करावीत. फारसे मोठे यश जरी मिळाले नाही तरी शिकस्तीचा प्रयत्न केल्याचे समाधान तरी लाभेल हेही नसे थोडके !

व्यवसायधंद्याच्या तंत्रमंत्रात थोडासा बदल केलात की, अल्पस्वल्प यश तरी पदरी पडल्यावाचून राहणार नाही. मुख्यत: प्रकृतीला जपा. आणि पैशा-अडक्याचे व्यवहार फारच दक्षतेने करा.

दि. २० ते २२ काहीसे अनुकूल दिवस.

चि त्र प ट

क ला वं ता ची

जी व न गा था

# ना य क

सत्यजीत रे सारख्या जागतिक कीर्तीच्या दिग्दर्शकाने जेव्हा एका चित्रपट-नायकाच्या जीवनावर चित्रपट काढायचं ठरवलं, तेव्हा ती कथा असामान्य असली पाहिजे, असे माझ्यासारख्या सत्यजीत रेंच्या चाहत्यांना वाटले होते. अशी कल्पना करणेही काही चुकीचे नव्हते! कारण जेव्हा सत्यजीत कथानक निवडतात, तेव्हा त्यामागे काहीतरी हेतू असतो. चित्रपट तंत्र-मंत्राच्या दृष्टीने ती कथा उत्तम असते. 'चारुलता' ह्या बोलपटापर्यंत सत्यजीतनी ह्या त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या कल्पनेला धक्का दिला नव्हता; पण त्यानंतरचा त्याचा 'का पुरुष ओ महापुरुष' ह्या चित्रपटाने चोखंदळ रसिकांना चांगलाच धक्का दिला. कारण रे-स्पर्श नसलेला असा तो बोलपट होता. 'नायक' ह्या चित्रपटाद्वारे सत्यजीत पुन्हा एकदा उत्कृष्ट चित्रपट सादर करील, अशी आशा करण्यात आली होती ती फोल ठरली. अशी शंका येऊ लागली की, सत्यजीत संपले तर नाही ना ?

अरिंदम मुकर्जी हा 'नायक' या चित्रपटाचा नायक दिल्लीला पारितोषिक घेण्यासाठी जाण्याच्या तयारीत असतो. कीर्ती आणि पैसा त्याच्या पायांशी लोळत असतो. अशा ह्या नायकाचा मूड त्या दिवशी जरा बिघडलेला असतो. त्याचे कारण म्हणज त्याचा नवा बोलपट चांगलाच आपटणार अशी चिन्हे दिसत असतात. आणि एका क्लबमधील मारामारीत अरिंदमचा हात असल्याची बातमी वर्तमानपत्रांनी मोठ्या अक्षरांत छापलेली असते. रेल्वेस्टेशनवर जाण्याआधी, त्याला

एका मुलीचा टेलिफोन येतो, आणि तेव्हा झालेल्या बोलण्यावरून त्याला तिच्याशी असलेले संबंध तोडायचे असल्याचे स्पष्ट समजते.

## रेल्वेतील कथाप्रवास

अरिंदम स्टेशनवर जातो आणि इथून चित्रपट कथानकाला खरी सुरुवात होते. ज्या डब्यात अरिंदमला जागा मिळालेली असते त्यातील खडूस म्हातारा चित्रपट नटाला सोबत द्यायला तयार होत नाही, म्हणून गार्ड अरिंदमला दुसऱ्या एका डब्यात जागा करून देतो. ह्या डब्यात एक कारखानदार, त्याची पत्नी आणि आजारी मुलगी प्रवास करत असतात. एक मोठा चित्रपट-नट आपल्या डब्यातून प्रवास करतो म्हणून साहजिकच कारखानदाराच्या पत्नीला आणि मुलीला आनंद वाटतो. कारखानदार त्याकडे दुर्लक्ष करतो. ह्याशिवाय जाहिरात व्यवस्थापक, त्याची सुंदर बायको हेही त्याच्या डब्यात असतात. त्याच डीलक्स गाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात अदिती—ह्या चित्रपटाची नायिका—आणि तिचे नातेवाईक प्रवास करतात. अरिंदम ब्रेकफास्ट करण्यासाठी रेस्टॉरंट कारमध्ये येतो. तिथे अदिती आपल्या नातेवाईकांबरोबर बसलेली असते. अदिती एका 'स्त्री' मासिकाची संपादिका असते. आणि ती दिल्लीला आपल्या काकाकडे जायला निघालेली असते. तरुण असते. दिसायला सुंदर असते. जाड चष्मा लावलेला असतो तिने. चष्म्यावरून तरी ती संपादिका वाटावी म्हणून! तिला ह्या चित्रपटनायकात विशेष रस नसतो. पण चटकन तिच्या मनात विचार



# स त्य जी त

संपले तर नाही ना

चमकून जातो. त्याची मुलाखत घ्यावी, त्यामुळे आपल्या मासिकाचा खप वाढेल असे वाटून ती अरिंदमला विचारते, पण तो नकार देतो.

ब्रेकफास्ट झाल्यानंतर अरिंदम आपल्या बर्थवर पडला असता त्याला झोप लागते. आणि त्या झोपेत त्याला भयानक स्वप्न दिसते. त्या स्वप्नात त्याच्याभोवती नोटांचा वर्षाव होत आहे आणि त्या नोटांच्या ढिगाऱ्यात बुडून तो मरत आहे आणि त्याचा नाटकातील जुना मित्र शंकरदा त्याच्याकडे बघून हसतोय पण हात मात्र देत नाही. अरिंदम घाबरून उठतो.

जेवायच्या वेळी अरिंदम पुन्हा एकदा भेटतो आणि मुलाखत द्यायला तयार होतो. त्यालाही सारं काही सांगायचं असतं. चित्रपटात येण्यापूर्वी त्याला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. अरिंदम नाटकातून कामं करीत असतानाच, प्रसिद्धीबरोबरच त्याला भरपूर पैसा मिळतो. स्त्रियांशी असलेल्या संबंधांविषयी अरिंदम आदितीला काहीच सांगत नाही.

दुपारच्या जेवणानंतर अरिंदम आपल्या बर्थवर पडला असता त्याला पुन्हा एक स्वप्न पडतं. प्रोमिला नावाच्या विवाहित स्त्रीशी त्याचा संबंध असतो. ती त्याच्याकडे चित्रपटात काम करण्यासाठी आलेली असते. आदल्याच दिवशी एका क्लबमध्ये तिच्या नवऱ्याशी त्याची मारामारी झालेली असते. या स्वप्नामुळे तो बेचैन होतो. सायंकाळी बेचैनी घालवण्यासाठी तो पुरी व्हिस्कीची बाटली रिती करतो. ती त्याला चढते. त्या तशा स्थितीत अरिंदम गाडीचा दरवाजा उघडून गाडीखालच्या रुळाकडे पाहत उभा राहतो. काही वेळाने तो अदितीला बोलावणे पाठवतो. तिला आपल्या आयुष्यातील रितेपणाची जाणीव देतो.

सकाळी पुन्हा ब्रेकफास्टच्या वेळी अदिती अरिंदमला भेटते. प्रसिद्धी–पैसा हा जरी असला तरी अरिंदमच्या आयुष्यात एकप्रकारची पोकळी निर्माण झालेली आहे याची तिला जाणीव होते. त्याच्या मुलाखतीमुळे उलट त्याच्याविषयीच्या लोकांच्या भावनांना तडा जाईल म्हणून ती त्याची मुलाखत फाडून टाकते.

दिल्ली स्टेशनवर अरिंदम उतरतो. त्याचे स्वागत होते. फोटो काढले जातात. पण ह्याकडे अदिती ढुंकूनही न पाहता आपल्या काकाबरोबर निघून जाते. अरिंदम मात्र उगाचच तिच्याकडे पाहत राहतो.

## प्रेक्षकांची निराशा

ही झाली ' नायक ' बोलपटाची कथा. एक सामान्य, निष्प्राण कथा. या कथेत ना कुठे नाट्य, ना कुठे हृदयाला हेलावून टाकणारे प्रसंग. विवाहित स्त्रीशी प्रेम-प्रकरण, सिनेमात पदार्पण केल्यावर जुन्या नटांकडून होणारी अवहेलना किंवा नाट्यसृष्टीतील लोकांनी अरिंदमला सिनेमात जाण्यापासून विरोध करणे यात विशेष असे काय आहे? हे नेहमीचंच आहे आणि व्हिस्कीची बाटली रिकामी करणं यांतही काही सत्यजीतनी नवीन सांगितलं नाही. बरं ही अतिसामान्य कथा घेऊनही

सत्यजीत काही कमाल करतील, अशी आशा होती. पण तेही नाही ! या अगोदर चित्रपट नायकाच्या जीवनात, गुरुदत्त यांनी 'कागज़ के फूल' नावाचा चित्रपट निर्माण केला होता. तो नाटच या दृष्टीने कितीतरी चांगला होता. त्याचप्रमाणे याच कथानकावर अनेक इंग्रजी चित्रपटही होऊन गेले. तेव्हा, सत्यजीतविषयी ज्या अपेक्षा होत्या त्या अपेक्षांना मात्र तडा गेला.

## शर्मिलेचा सामान्य अभिनय


चित्रपटात नायकाची भूमिका उत्तमकुमार या प्रसिद्ध बंगाली नटाने केली आहे. ती चांगली आहे. त्याच्या कीर्तीला साजेशीच आहे. 'अदिती'ची भूमिका शर्मीला टागोरने केली आहे. शर्मिलाने सत्यजीतच्या 'अपूर संसार' या चित्रपटाने चित्रसृष्टीत सन्मानाने पदार्पण केले. त्यानंतर तिने सत्यजीतच्या 'देवी' या चित्रपटात उत्कृष्ट भूमिका केली होती. आणि त्यानंतर हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केल्यानंतर सत्यजीतच्या चित्रपटातली ही पहिली भूमिका. खरं म्हटलं तर तिलाही भूमिका साजेशी नव्हतीच; आणि तिनेही त्यात विशेष रस घेतलेला दिसत नाही. इतर साहाय्यक भूमिकेच्या दृष्टीने विचार करता, सिनेमासृष्टीत प्रवेश मिळविण्यास उत्सुक असलेल्या स्त्रीची भूमिका उत्तम झाली आहे.

सत्यजितच्या दिग्दर्शनात तसे नेहमीचे बारकावे आढळतात. गाडीतील इतर प्रवाशांचे कथानकाला पूरक होतील असे शॉटस् त्यानी घेतले आहेत. पण कथानकाला त्यामुळे काही विशेष गती येत नाही. सत्यजीतचा स्पर्श या बोलपटात दिसतो फक्त तीन ठिकाणी. स्वप्नाची दोन दृश्ये आणि अरिंदम 'प्याल्या'वर गाडीचा दरवाजा उघडून उभा राहतो तेव्हा काळोखात चमकणाऱ्या रुळांची दृश्ये.

आणि शेवटी चित्रपटाचे संगीत. चित्रपटाच्या कथेप्रमाणे संगीतही सत्यजीत रे यांचे आहे. ते अतिसामान्य आहे. त्याचा चित्रपटाला मुळीच हातभार लागत नाही.

ह्या चित्रपटाचा आणखीन एक अवगुण म्हणजे ह्या चित्रपटात संवाद खूप आहेत. त्यामुळे कलाकारांना आपल्या चेहऱ्यावर सूक्ष्म हावभाव दाखवायला वेळच मिळत नाही. उत्तम चित्रपट म्हणजे, कोणत्याही अन्यभाषी प्रेक्षकाला त्यातील पात्रांच्या अभिनयामुळे जो सहज समजतो तो होय. त्याला भाषेची अडचण जाणवत नाही. चुखराय, कुरोसना किंवा सत्यजीत रे हे दिग्दर्शक असे आहेत की ज्यांच्या चित्रपटांना भाषेची अडचण येत नाही. पण या वेळी मात्र सत्यजीत रे चांगलेच फसले. ●

**पुरुषोत्तम बावकर**



# तर्कहीन अर्थशून्य घटनांची मालिका


# दस लाख

प्रेक्षकांच्या सहनशीलतेचा अंत पाहणारा 'दस लाख' हा चित्रपट आहे. हिंदी सिने-प्रेक्षकांना किमान बुद्धीही नसावी, असाच निर्माते-दिग्दर्शक देवेंद्र गोएल यांचा समज दिसतो. नाहीतर 'दस लाख'चे वितरण करण्याचे धाडस त्यांनी केले नसते. मद्रासी चित्रपटांनाही मागे सारतील अशा तर्कहीन, अर्थशून्य घटनांनी हा चित्रपट भरला आहे. काही ठिकाणीच प्रसन्न वाटणारे ईस्टमन रंगांतील छायाचित्रण वगळले तर हा चित्रपट अत्यंत खालच्या दर्जाचा आहे.

लक्षाधीश बनण्याची सतत स्वप्ने पाहणाऱ्या एका छोटया दुकानदाराचा एक नातेवाईक त्याच्यासाठी खरोखरच दहा लाख आणि काही हजार, काही शे रुपये आणि काही नये पैसे मागे ठेवून निधन पावतो. अचानक श्रीमंत झालेला हा व्यापारी एका बाईच्या नादी लागतो व त्याच्या संसाराची —त्याला दोन मोठे मुलगे—एक लग्न झालेला—नातवंडे वगैरे असतात—परवड होते. शेवटी त्याची भावी सून त्याच्या डोळयात अंजन घालते व सर्व काही सुरळीत जमते. या कथेच्या 'दस लाख' या चित्रपटाच्या पटकथेतून काहीच अर्थ निर्माण होत नाही. एका मागोमाग एक दाखविलेल्या अतिशय नाटकी, भडक घटनांची माला म्हणजे हा चित्रपट बनला आहे. सेटस् तर हा चित्रपट १९३०-४० साली तयार केला असावा इतके नकली वाटत होते. सगळयाच तांत्रिक अंगांची थोड्याफार फरकाने हीच अवस्था आहे.

ओमप्रकाशची प्रमुख भूमिका काही ठिकाणी चमकदार आहे. बाकी सर्व कामे दुर्लक्षिण्याजोगी. रमेश देव हिंदी पडद्यावर परक्यासारखा वाटतो व वागतो. व्यापाऱ्याची मोठी सून म्हणून सीमा ठीक आहे. प्राणचा विदूषकच केला आहे. मनोरमाचा नखरा जरा जादा झाला आहे. 'बाबिता'चा राज्ञ चित्रपट मुंबईत प्रथम लागला असला तरी तिचा शोध गोएल यांनी या चित्रपटाद्वारे प्रथम लावला. ती या चित्रपटात बिलकुल निष्प्रभ आहे. ब्र-चारी हा नवा विनोदी नट विनोदीच वाटतो.

चित्रपटास रवीचे संगीत आहे. पंधरा मिनिटांतच चित्रपटाची चमक ध्यानी येते आणि प्रत्येक मिनिटाला उठून घरी जावे हाच एक विचार डोक्यात असतो. ●




**या युत्यांनी नवग्रहही लाजले.**




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**